# विषमता निर्मूलन समितीची
# दहा वर्षे



- शांताराम पंदेरे

# प्रकाशकाचे दोन शब्द

घोषणा मासिकाने यावर्षी ७ व्या वर्षात पदार्पण केले. मासिका व्यतिरिक्त चळवळीशी संबधीत वैचारिक आणि व्यावहारिक साहित्य निर्मिती व प्रकाशन करण्याची आमची बरेच वर्षांपासून इच्छा होती. आणिबाणीपूर्वी 'संवाद' द्वारा काही पुस्तिका प्रकाशित झाल्या होत्या. त्याधर्तीवर सदर पुस्तिका आम्ही प्रकाशित करत आहोत.

अशा साहित्य निर्मितीच्या निमित्ताने चळवळीतील अनेकविध प्रश्नांवर विविध विचारप्रवाहाशी नाते सांगणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सखोल आणि साकल्याने विचार विनिमय घडावा असा यामागे हेतू आहे. या पुस्तिकेतील विचार पूर्णपणे व्यक्तिगत स्वरूपाचे आहेत हे येथे आम्ही मुद्दाम नमूद करू इच्छितो. तसेच या स्वरूपाचे प्रयत्न या पुढच्या काळामध्ये सातत्याने होत रहावे असेही आम्हाला वाटते. इतरांनाही यातून प्रेरणा मिळावी. आमच्या कुवतीनुसार ही प्रक्रिया गतिमान करण्याचा आमचा जरूर प्रयत्न राहील. या कामी आपल्या सर्वांचे सहकार्य व सदिच्छा याची आम्हाला नितांत आवश्यकता आहे. ते आम्हाला वेळोवेळी मिळत राहिल असा विश्वास वाटतो.

या पुस्तिकेच्या प्रकाशनामध्ये ज्या अनेक व्यक्तींनी व संस्थांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे मनापासून आभारी आहोत,

**वसुधा सरदार**

## प्रिय साथी–कॉम्रेडस्,
## क्रांतीकारक अभिवादन.

दहा वर्षापासून 'विषमता निर्मूलन शिबीरास' येण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. अनुभव आपणा सर्वांना सांगत आलो. भारावलेपण होते. साहजिकच होते ते. आपणा सर्वांचेही अनुभव ऐकत आलो. समजून घेण्याचा प्रयत्नही केला.

दरवर्षी जानेवारी आला की, २० मार्चची आठवण यायची. स्वत:च्या आयुष्यातील अशी कोणतीच तारीख एवढी भावली नाही. अनुभव सांगता सांगता प्रश्न पडत गेले. संघटनेत व बाहेर याविषयी खुलेपणाने बोलत राहिलो.

बुद्धीला - तर्काला जे पटले व संघटना सहकाऱ्यांना जे समजून देवू शकलो त्या कामात खूप राबलो माझ्या सहकार्यासोबत. अजूनही राबणे चाललेच आहे.

अनुभव - भूमिका - कार्यक्रम - लढ्याचा मार्ग संघटना - तत्वज्ञान - सिद्धांत - कार्यपद्धती - सहकारी आदीबाबत सतत डोक्यात घुसळण चालते.

भयाण दुष्काळी गावातल्या एखाद्या कोपीत जाऊन चुलीजवळ बसून भाकरी थापणाऱ्या माय-बहिणीशी बोलतो. चिलीम पिणाऱ्या म्हाताऱ्या बाबाशी बोलतो.

या वागण्याची निश्चत आखिव-रेखीव कार्यपद्धती असते फारसे ठाऊक नव्हते. शोध घ्यायचा आग्रह सहकाऱ्यांजवळ धरला त्यांनी त्याचा अर्थ लावला. संघटना फुटल्या. नुकसान होतेच. तरीही इतर सहकाऱ्यांसारखेच सार्वजनिक व खाजगी जीवन सुरु राहिले.

संसद बाह्य संघटना–चळवळींची कोंडी झाल्याचे जाणवतेय. ती सर्व प्रकारची आहे. ह्यातून मार्ग काढणारे विविध राजकीय पक्षात-व्यापक राजकीय प्रवाहात गेले परंतु त्यातून कोंडी फुटेल असे अजूनही मनातून वाटत नाही. ज्या जनसमूहात आपण सर्वजण आहोत तेथेही असेच जाणवतेय.

'भारतीय वास्तव' समजून घ्यायचा खूप आटापिटा चाललाय आपणा सर्वांचा. यासाठी विशिष्ट राजकीय सिद्धांत-नेतृत्व यांच्या मागे भावनावेगाने जाणे कधी जमले नाही. बुद्धीला पटले नाही. मैत्री-प्रेम एका मर्यादेपर्यंत जमते. पण स्वत:चे मत ठरविताना ते

आड येवू नये असे नेहमीच जाणवते.

याच भूमिकेतून 'विनिशि'त येत होतो. दरवर्षी तोच तोच पणा येवू लागला. प्रश्न तसेच रेंगाळू लागले. स्वतः रात्रं-दिवस कामांत असल्याने व स्वतःचे पडलेले काम जरी असले तरी बाह्य वास्तब व इतर प्रवाह यांचे भान सुटू नये म्हणून खूप तगमग होते. या व्यास-पीठावर सर्व अनुभवी-अभ्यासू सहकारी येतात. सर्व मिळून आपापले झेंडे, संघटना, अभिनिवेश विसरून खराखूरा संवाद होईल अशी अपेक्षा. पण ते जमेना-समोर घडताना दिसेना.

म्हणुन सर्वांनी केलेल्या एका प्रयत्नाकडे वळून पहाण्याचा हा एक प्रयत्न केला आहे.

येथे एक व्यक्ती-एक संघटना-एक घटना व तिचे मूल्यमापन केलेले नाही. जे घडले त्याला एक कोणीतरी सर्वस्वी जबाबदार असतो असे कधीच वाटत नाही

त्यामुळे यातून कुणाही सहकाऱ्याला दुखावल्याची जाणीव झाली तर तो माझा हेतु नाही. तो माझ्या लिखाण-मांडणीचा दोष मानावा. त्याबद्दल आताच क्षमा चाहतो.

एक प्रयत्न अपुरा ठरला म्हणून तिथेच थांबणे व तेच तेच करणेही चुकीचे वाटते. नव्या उमेदीने – नव्या जाणिवेने सर्वांसोबत नवा प्रयत्न करायची ही योग्य संधी असते. फक्त जुन्या प्रयत्नांची चिकित्सा हवी डोळसपणे.

काळ भिषण आहे. वेळ थोडा आहे चुका करण्यासाठी. म्हणून मागे वळून पहाण्याची आपण सर्वांनी मिळून कृती करू या. हीच या लिखाणामागची अपेक्षा.

यासाठी म. फुले समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी 'पुरोगामी सत्यशोधक'चे मागील सुमारे दहा वर्षातील अंक उपलब्ध करुन दिले. त्याबद्दल त्यांचा मनापासून ऋणी आहे. अनेक संघटनांचे कार्यकर्ते व 'विनिशि' तील सहभागी व्यक्ती यांच्याशी बोलता आले. त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या, त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

**आपला सहकारी,**

**शांताराम पंदेरे**

**औरंगाबाद**

**३० आक्टो. १९८६**

# पुणे येथील मेळावा: विनिस: पार्श्वभूमि:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्यावर केलेल्या सत्याग्रहाला १९७७ मार्च मध्ये ५० वर्षे पूर्ण होत आहेत. ५० वर्षानंतर या प्रश्नाचे स्वरूप सौम्य होण्याऐवजी दिवसेंदिवस उग्र होत चालले आहे. असे असून राजकीय पक्षांमध्ये किंवा अन्य समाजधुरीणांमध्ये या प्रश्नाला अग्रक्रम देऊन काम करण्याची वृत्ती निर्माण झाल्याचे दिसत नाही. म्हणून इंडियन सेक्युलर सोसायटी, समाज प्रबोधन संस्था, म. फुले प्रतिष्ठान व आंतरभारती या संस्थांनी पुढाकार घेऊन सामाजिक समतेच्या प्रश्नावर आधी एक सेमिनार भरवून २९/३० जानेवारी ७७ रोजी महाराष्ट्रात या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींचा व व्यक्तिंचा मेळावा गोखले अर्थशास्त्र संस्थेत आयोजित केला. दि. २९ च्या सत्राचे सूत्रचालन प्रा. मे. पुं. रेगे यांनी केलेल्या सत्रात उपस्थित संस्थांच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्थेची प्रेरणा, कार्य आणि अडचणी मांडल्या. दि. ३० च्या सत्राचे सूत्र-चालन डॉ. आंबेडकरांचे सहकारी प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी केले. या सत्रात प्रा. वसंत देशपांडे यांनी तयार केलेल्या कार्यक्रम विषयक टिपणांवर चर्चा होऊन ते काही सुधारणांसह मंजूर झाले. उपस्थित संस्थांनी येथे वर्षभर या प्रश्नास अग्रक्रम देऊन कार्य करण्याचे जाहीर केले. महाड स्मृती दिनानिमित्त २० मार्च या दिवशी ठिकठिकाणी सभा घेऊन त्यात लोकांनी पुढील कार्यक्रम जाहीर करावा असे ठरले. वर्षभरात सोयीच्या वेळी त्या त्या भागातल्या लोकांनी महाडच्या दिशेने किंवा आसपासच्या खेड्यातून पदयात्रा काढून वाटेत लागणाऱ्या खेड्यात 'एक गाव एक पाणवठा,' 'एक गाव एक मसणवाट' आणि अन्य प्रश्नांना चालना देऊन लोकमत तयार करावे असे ठरले. या कार्यक्रमाला सुसूत्रता यावी म्हणून वर्षभरासाठी एक कृती समिती स्थापन होऊन त्यावर उपस्थित संस्थांचे प्रतिनिधी व अन्य व्यक्ति घेण्यात आल्या. प्रा. वसंत देशपांडे यांनी कार्यवाह म्हणून काम पहावे असे ठरले. टिपणात दिलेली शपथ सर्वांनी घेऊन मेळावा संपला. त्याच दिवशी सायंकाळी गोखले हॉलमध्ये ग. बा. सरदार यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन त्यात मेळाव्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.

**कार्यक्रमविषयक टिपण –**

जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी दोन पातळींवर कार्यक्रमाचा विचार करता येईल. १) सामान्य माणसाच्या मनावरील सनातनी विचारांचा पगडा नष्ट करण्यासाठी धार्मिक, सांस्कृतिक विचारांची चिकित्सा करणे व त्याचबरोबर नवीन

विचारांचा, मूल्यांचा संस्कार करणे. २) सामूहिक आणि व्यक्तिगत पातळीवर कृतीसाठी मार्गदर्शन करणे.

## वैचारिक स्पष्टतेसाठी कार्यक्रम –

१) धार्मिक ग्रंथांची चिकित्सा, २) पौराणिक वाङमयाची चिकित्सा, ३) धार्मिक, सांस्कृतिक, सण, समारंभ, उत्सव, कर्मकांडे इत्यादी, ४) नवीन मूल्यांची जोपासना, ५) घटनेतील तरतूदी, कायदेकानू यांतील विचार ६) पाठ्य-पुस्तकांचे परीक्षण, ७) ललित साहित्य, ८) शिक्षकांचे प्रबोधन, ९) कार्यकर्त्यांचे मेळावे :– जात पात मोडीसाठी ग्रामीण व शहरी विभागात कार्य करणाऱ्या संस्था वा व्यक्तींचे प्रयत्न एकाकी रहातात; त्यांची माहितीही इतरांना नसते. अशा कार्यकर्त्यांचा एकमेकांशी परिचय व्हावा व या क्षेत्रांतील अनुभव, कामाच्या पद्धती यासंबंधी एकत्रित विचारविनिमय व्हावा, यासाठी अशा कार्यकर्त्यांचे मेळावे आयोजित करणे आवश्यक वाटते. अशा मेळाव्यांमध्ये एक व्यापक चळवळ निर्माण होण्याची शक्यता असते. व्यक्तिशः कार्यकर्त्यांनाही अशा मेळाव्यातून मदत व प्रोत्साहन मिळू शकेल या कार्याच्या प्रसिद्धीमुळे इतरांनाही या क्षेत्रांत काम करण्याची स्फूर्ती मिळू शकेल.

या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून या क्षेत्रातील महत्त्वाच्या चळवळींचा व घटनांचा वृत्तांत प्रसिद्ध करावा. कार्यकर्त्यांची चरित्रे व उपक्रम यांच्या प्रसिद्धी-साठीही प्रयत्न करावेत. १०) शिक्षण संस्थांचा सहभाग. ११) राजकीय पक्षांची जबाबदारी. राजकीय पक्षांनी संयुक्तरीत्या या क्षेत्रांत कार्यक्रम आखून तो पार पाडावा. अशा कार्यक्रमातून पक्षाच्या संकुचित दृष्टीकोनातून भाग न घेता, समाज परिवर्तनाची जबाबदारी म्हणूनच या कार्यक्रमात उतरावे. १२) इतर सार्वजनिक संस्था :–ग्रामीण व शहरी भागात सार्वजनिक काम करणाऱ्या अनेक लहान मोठ्या संस्था असतात. तरुण मंडळे, महिला मंडळे, साहित्यप्रेमी लोकांच्या संस्था, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युक्रांद यासारख्या तरुणांच्या संघटना या सर्वांनी दलि-तांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य द्यावे. स्वतंत्रपणे व शक्य असल्यास संयुक्तपणे या संस्थांनी कार्यक्रम आखावेत व ते पार पाडावे.

# सामुहिक व व्यक्तिगत कार्यक्रम

## १) कृती समितीची स्थापना–

२९–३० जाने. १९७७ च्या मेळाव्यात एक कृती समिती स्थापन करून नंतर त्याच धर्तीवर जिल्हावार कृती समित्या स्थापन कराव्यात. कृती समिती ही एक पुरोगामी विचारांच्या व्यक्तींची संयुक्त आघाडी म्हणून काम करेल.

२) कायदे सल्लागार केन्द्र, ३) स्थानिक पातळीवरील संस्थात दलितांना स्थान देणे, ४) शपथविधी–दि. १५ ऑगस्ट व २६ जाने., म. गांधी, डॉ. आंबेडकर, म. फुले इ. मान्यवर व्यक्तींच्या जन्मदिनी ठिकठिकाणी खालीलप्रमाणे शपथा घेण्याचा कार्यक्रम पार पाडावा.

## प्रतिज्ञा

मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, माझ्या सार्वजनिक आणि खाजगी जीवनात मी अस्पृश्यता पाळणार नाही. सामाजिक समतेच्या आड येणाऱ्या अंधश्रद्धा, रूढी आणि जन्माधिष्ठीत उच्चनीचता यांना माझा विरोध असून त्यांच्यावर आधारलेल्या कोणत्याही सार्वजनिक व खाजगी कार्यक्रमात मी भाग घेणार नाही. मी वर्णव्यवस्था आणि जातीसंस्था मानीत नाही. कोणत्याही धर्मग्रंथाचे प्रामाण्य समाज रचनेला पायाभूत मानू नये असे माझे स्पष्ट मत आहे.

पुणे येथे म. फुले समता प्रतिष्ठान, इंडियन सेक्यूलर सोसायटी, समाज प्रबोधन संस्था, युक्रांद, राष्ट्र सेवा दल, दलित महामंडळ, दलित युवक आघाडी, प्रोग्रेसिव्ह स्टुडंटस् असोसिएशन, आंतरभारती, बामसेफ, समाजवादी युवजन सभा, समाजवादी युवक दल, शंकर ब्रम्हे समाज विज्ञान मंदिर इ. संस्थांच्या व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या मेळाव्यात वरील प्रतिज्ञा करण्यात येऊन, येते एक वर्ष दलित प्रश्नास वाहून घेण्याचा निश्चय करण्यात आला.

५) सप्ताह इत्यादी : डॉ. आंबेडकर, म. फुले, म. गांधी, महर्षि शिंदे, महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, शाहू महाराज अशा व्यक्तिच्या स्मरणार्थ कार्यक्रम आखावा. ६) दि. २० मार्च हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा व्हावा. ७) ग्रंथालये, ८) पदयात्रा, ९) खेडेगावातील कार्यक्रम, १०) ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थी. ११) आंतरजातीय विवाहांना उत्तेजन देणे.

(महात्मा फुले समता प्रतिष्ठानचे मुखपत्र–पुरोगामी सत्यशोधक : वर्ष २ : अंक ४ : डिसें. १९७६)

## पाणवठा चळवळीतील कार्यकर्त्यांचे शिबीर –

पुण्यातील या ऐतिहासिक मेळाव्यानंतर २७ ते ३० मार्च ७८ ला पाणवठा चळवळीतील कार्यकर्त्यांचे पुण्यात हमाल भवन येथे शिबीर झाले. चंद्रपूरपासून निपाणी, कोल्हापूरपर्यंत सुमारे अडीचशे कार्यकर्ते या शिबिरास आले होते. प्रत्यक्ष राबणाऱ्या या कार्यकर्त्यांच्या अनुभवातून महाराष्ट्रातील सामाजिक वास्तवतेची कल्पना येत होती. शिबिरात लक्ष्मणशास्त्री जोशी, बाबुराव बागूल, रावसाहेब कसबे, अ. भि. शहा, नलिनी पंडित, गोविंद गारे, दौलतराव भोसले आदींनी काही विषयावर व्याख्यानेही दिली.

या शिबिराच्या फायद्याविषयी पुरोगामी सत्यशोधक (पुस) च्या एप्रिल–मे जून १९७८ च्या अंकाच्या सपादकीयात अनिल अवचट लिहितात–

या चळवळीतील ठिकठिकाणचे कार्यकर्ते एका ठिकाणी प्रथमच जमले. त्यावरून या चळवळीचे स्वरूप केवढे व्यापक आहे, मार्ग केवढा बिकट आहे याची कार्यकर्त्यांना जाणीव झाली. दुसरे म्हणजे सांस्कृतिक परिवर्तनाबरोबरच ही चळवळ दलितांच्या शेतीचे प्रश्न, निपाणीच्या असुरक्षित विडी जर्दा कामगारांचे प्रश्न यासारख्या आर्थिक कार्यक्रमांकडे वळू लागली आहे, असे दिसते.

## नामांतर पार्श्वभूमिवरील लातूरचे ऐतिहासिक शिबीर

यानंतरचे शिबीर नागपूरला घ्यायचे ठरले होते. परंतु मराठवाड्यात मराठवाडा विद्यापिठाच्या नामांतराच्या निमित्ताने दलितांवर जे अमानुष अत्याचार झाले त्यांचा संदर्भ आणि त्यांनी निर्माण केलेले प्रश्न लक्षात घेऊन हे शिबीर मराठवाड्यातच झाले पाहिजे असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला. निर्णयही झाला. लातूरच्या राजर्षि शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य जनार्दन वाघमारे यांची शिबीर समितीच्या निमंत्रकपदी निवड झाली.

दि. १८ ते २० मार्च १९७९ ला लातूरला भरलेल्या या विषमता निर्मूलन शिबीरांच्या (विनिशी) प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य वाघमारे म्हणतात–

" महाराष्ट्रातील समाज प्रबोधनाचा पाणवठा ही आग विझवू शकेल का ? महात्मा फुलेंच्या हौदातील पाणी, राजर्षि शाहूंच्या पंचगंगेतील पाणी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या करस्पर्शाने पुनित झालेल्या महाडच्या चवदार तळ्यातील पाणी एकत्रीत आणता आले आणि त्यात सानेगुरुजींची अश्रूधारा मिसळता आली तर ही आग आपल्याला विझवता येईल असे मला वाटते. पण हे अवघड काम कोणी व कसे करायचे ? मराठवाड्याने निर्माण केलेल्या ह्या आव्हानाचा स्विकार मराठवाड्याच्या भूमितच करता यावा म्हणून हे 'विनिशि' आम्ही लातूरला आयोजित करीत आहोत. या शिबिरात भाग घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना व विचारवंताना निश्चित अशी दिशा सापडावी अशी आमची इच्छा व अपेक्षा आहे आणि वास्तविक आता आवश्यकता आहे ती 'सोशल ॲक्शन' ची !"

(पुस. जाने. मार्च १९७९ : वर्ष ४ : अंक १ : पान ५)

म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान व इंडियन सेक्युलर सोसायटीच्या भरलेल्या या शिबिरात सुमारे ६०० कार्यकर्ते प्रतिनिधी म्हणून आले होते. उद्घाटक प्रा ग. बा. सरदार होते. आपल्या भाषणात प्रा. सरदार म्हणतात, "–सर्व शोषितांचे प्रश्न एकाच पातळीवरचे, प्रत्येकाचा आशय वेगळा, मार्ग वेगळा पण शोषणमुक्त समाजनिर्मिती हे ध्येय एकच. यासाठी विविध विचारसरणींची

माणस एकत्र जमलीत. त्यामुळं सामूहिक समग्र जीवनाचं दुखणं आणि अिलाजाची चर्चा व्हावी."

'एक गाव एक पाणवठा' चळवळीचे नेते डॉ. बाबा आढावांनी यावर आपले विचार मांडले, "–आपली बांधिलकी सामाजिक समतेशी. इथ विविध विचारांच्या संघटना आलेल्या. प्रत्येकाचा कंगोरा वेगवेगळा. पण परिवर्तनाच्या ऐरणीवर आपण सर्वांना एकत्र यायचंय."

दलित साहित्यिक बाबुराव बागुल 'विनिशि' कडून अपेक्षा व्यक्त करताना म्हणतात, "निवडणुकीनं जाति संघटना संघटित झाल्या. जातींच उदात्तीकरण झालं⋯ ⋯दलित-दलितेतरांना एकत्र आणण्यासाठी आर्थिक लढे उभारायला हवेत नि सामाजिक, सांस्कृतिक लढाही हवा."

शिबिराचे अध्यक्ष प्राचार्य म. भि. चिटणीस म्हणाले, "–विचारानं प्रगत पुरोगामी माणस आचारान विषमता पाळतात. मार्क्सच्या मतानुसार या देशात सर्वात जास्त 'अलिअनेशन नि डिह्युमनायझेशन' दलितांचं झालं. भारतीय लोकशाही ही मेजॉरिटीची म्हणजे कम्युनल मेजॉरिटीची झाली. म्हणूनच दलित शोषित एकत्र यायला पाहिजेत."

(लेख. सुधीर गव्हाणे, सा. मनोहर : १५–२१ एप्रिल ७९)

या शिबिराचे वैशिष्टच म्हणजे विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय संघटनांसह शेकाप, सत्य. कम्यु. पक्ष, माकप, भाकप, दलित पँथर, लानि पक्ष मार्क्सवादी लेनिनवादी (नक्षलवादी) पक्ष, जनता पक्ष, इंदिरा काँग्रेस, आदी राजकीय पक्षांचे नेते भाई उद्धवराव पाटील, कॉ. तानाजी ठोंबरे, कॉ. शरद पाटील कॉ. भास्करराव जाधव, कॉ. ज्योत्स्ना मराठे, खा. टी. एस्. शृंगारे, मोतीराज राठोड, मनोहर गोमारे, गणपतराव पिडगे, अलका मोरे, छायाताई सुरतवती, रावसाहेब कसबे, प्राचार्य म. भि. चिटणीस, बाबुराव बागुल, विजया इंगोले, नरेंद्र दाभोळकर, दत्ता सोमवंशी, सुधीर गव्हाणे, शाम आगळे, विठ्ठलराव दुडोले, अ. भि. शाहा, प्राचार्य जनार्दन वाघमारे, प्रा. गं. बा. सरदार, बाबा आढाव, नागेश चौधरी, अरुण कांबळे, प्राचार्य राजाराम राठोड, अविनाश डोळस, अनिल अवचट, प्राचार्य भ. कि. सबनीस, दलपतराव सोळुंखे, रा. प. नेने, सीताराम रायकर, अजित सरदार, जयंत वैद्य, कुमार शिराळकर, ना. य. डोळे, मुनीर सय्यद, आदी प्रमुख मंडळी हजर होती.

प्राचार्य वाघमारे यांनी आपल्या प्रास्ताविकात एका सामाजिक व्यासपीठाची गरज का जाणवतेय ते सांगितले, "त्यामुळे एकमेकांच्या कार्यांची माहिती एकमेकांना मिळेल. त्यांच्या अनुभवांची व विचारांची देवाण घेवाण करता येईल. त्यांचे कार्य एकमेकांना पूरक करण्याचा विचार करता येईल. एकमेकांच्या कार्यांचे मूल्य-

मापन करता येईल. पुढील दिशा स्पष्ट करून घेता येईल आणि पुढील कामासाठी आवश्यक असणारा 'पर्स्पेक्टिव्ह मिळेल."

(पुस: जाने–मार्च १९७९: वर्ष ४–अंक १: पान ९)

'विनिशि 'च्या लातूर शिबीराने एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. सह-भागी सर्व संघटना–राजकीय पक्ष व व्यक्तींना या अशा सामायिक व्यासपीठाची गरज मनापासून जाणवत होती. २२ जुलै ७९ ला औरंगाबाद येथे नामांतरवाद्यांच्या समता परिषदेमध्ये मराठवाडा विद्यापीठ नामांतरासाठी ६ डिसें. १९७९ या बाबासाहेबांच्या महानिर्वाणदिनी सविनय कायदेभंग करण्याचे ठरले. त्या सत्या-ग्रहात दलितकष्टकरी जनतेबरोबर सहभागी झालेले तमाम कार्यकर्ते पाहिल्यावर याचे प्रत्यंतर आले.

मानवी समाज परिघाबाहेर असलेला आदिवासी व भटकाविमुक्त समाजही मोठ्या संख्येने या सत्याग्रहात उतरविण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न काही राजकीय पक्ष व संघटनांनी केला ही या लढ्याची अत्यंत महत्त्वाची बाजू आहे.

## नागपूरची सामाजिक समता समिती

'विषमता निर्मूलन समिती' (विनिस) च्या या काळातच नागपूरला 'सामाजिक समता परिषद' नागपूर जवळच्या अनेक गावातून अस्पृश्यता व जातियतेच्या प्रश्नावर संघर्ष देत होती. नरेश मेश्राम, अशोकथूल, विमलकीर्ती, विनायक जमदाडे, विनायक कऱ्हाडे, स. सो खंडाळकर, नागेश चौधरी, म. य. दळवी, के. टी, मेश्राम, डॉ. राऊत, पुष्पा विमलकीर्ती, अनिल वासनिक, प्रभा डुले, जयशंकर पिल्ले, दत्तानंद इंगोले. 'सामाजिक समता समिती' (सासस) चे आदी कार्यकर्ते खूप परिश्रम घेत होते.

१३ ते १४ जाने. १९७९ ला महाराष्ट्रातील सामाजिक समतेसाठी सघर्षरत असलेल्या कार्यकर्त्यांचे शिबीर घेतले होते. विदर्भ, खानदेशसह महाराष्ट्र व छिंद-वाडा, बैतुल, भोपाळ आदी ठिकाणचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने नागपूरच्या या शिबीरात आले होते.

१) 'बिहार ते मराठवाडा' दलित अत्याचार कांड आणि सामाजिक सम-तेचा प्रश्न व २) 'आजच्या संदर्भात समतावादी राजकारणाची दिशा' या दोन विषयांवर परिसंवादही आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात एक गाव एक पाणवठा चळवळीशी बांधिलकी असणारे, स्वतंत्रपणे काम करणारे तसेच भाकप, लाल निशाण, भाकप (माले), युक्रांद, सोशालिस्ट युनिटी सेंटर, छात्र युवा संघर्ष वाहिनी, महाराष्ट्र समाजवादी युवक संघटना, श्रमिक संघटना, दलित पँथर, मुक्ती वाहिनी आदी संघटना व पक्षांचे कुमार शिराळकर, म. य. (बाबा) दळवी, डॉ. भाऊ लोखंडे, अँड. रामभाऊ कोल्हे,

वामन निंबाळकर, डॉ. बोकरे, डॉ. कडू, पुष्पा मेश्राम, हरणे, अशोक थूल, ॲड. मोतीराम पावडे, अजित सरदार, नेताजी राजगडकर, प्रताप भोसले, अशोक मर-सकोले, नागेश चौधरी आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## इतर संघटना व त्यांच्या चळवळी

नांदेडला डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली समता निर्माण समिती तर कोल्हापूरला बापूसाहेब पाटील, सुरेश शिपूरकर यांच्या प्रयत्नाने सामाजिक समता व्यासपीठ सक्रिय होते.

बुलढाणा व बीड जिल्ह्यात दलित युवक आघाडी, सातारा परिसरात समाजवादी युवक दल, धुळे जिल्ह्यात श्रमिक संघटना व मजूर संघर्ष वाहिनी, व सकप, ठाणे जिल्ह्यात भूमिसेना, कष्टकरी संघटना व ग्रामस्वराज्य समिती, नगर जिल्ह्यात राशिन परिसरात युवक क्रांती दल आदी राजकीय पक्ष व संघ-टना सामाजिक समतेच्या प्रश्नावर सतत लढे देत होत्या.

नामांतराच्या प्रश्नावर भारतीय दलित पँथर व नामांतरवादी विद्यार्थी नागरिक कृती समिती तर सर्व तांकदीनिशी संघर्षात उतरल्या होत्या.

## 'नागपूरचे दुसरे महत्वाचे विनिशि' –

बाब्रा दळवी व त्यांच्या सहकाऱ्यांनी २० ते २२ मार्च १९८० ला नागपूरला 'विनिशि' घेतले. लातूर 'विनिशि' नंतरच्या ऐतिहासिक व अभूतपूर्व अशा नामांतर सत्याग्रहाची या शिबिराला पार्श्वभूमी होती. भूमिकेच्या पातळीवर काही आग्रह धरून व्यापक विचार मानणाऱ्या डाव्या पक्ष-संघटनातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने या शिबिरात आणण्यात सामाजिक स. स. च्या कार्यकर्त्यांना यश आले.

या शिबिरात दलित, बौद्धेतर दलित, भटके-विमुक्त, बहुजन व दलित स्त्रिया, शेतमजूर, बेकार तरुण यांच्या प्रश्नांवर विविध निबंध मागवून गटागटात चर्चा घडविण्यात आल्या.

परंतु या महत्वाच्या चर्चेनंतर शिबीराच्या अखेरीस निव्वळ अनुभव कथन व अहवाल न देता समतावादी चळवळीचे तत्त्वज्ञान व वर्ण-जाती लढ्याची रणनिती बाबत मांडणी करण्याचा नागपूरच्या शिबीर संयोजन समितीतील अने-कांचा आग्रह होता. या विषयीच्या चर्चेला इथून सुरुवात करू या असे त्यांचे मत होते. परंतु हेही शिबीर अखेर फारसे काही न ठरवता व मोलाची वैचारिक मांडणी न करताच उरकले गेले!

तरीही 'विनिशि' व या इतर व्यासपीठांचे या काळातील ऐतिहासिक महत्व नाकारून चालणार नाही.

## 'विनिशि'चे ऐतिहासिक महत्व –

या सर्व प्रयत्नात 'विनिशि'ला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होवू पहात होते. या 'विनिशि'च्या महत्वाचे कारण शोधताना तत्पूर्विच्या दशकाकडे जावे लागते.

दिल्लीत पंडीत जवाहरलाल नेहरू ब्रिटीशांकडून स्वातंत्र्याची सूत्रे स्विकारीत होते. तिरंगा फडकविण्याच्या तयारीत होते आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेते महात्मा गांधी नोआखलीला एकटे चालले होते. भारताची फाळणी व पाकिस्तान निर्मिती यातून हिंदु-मुसलमानांमध्ये हत्येचे सत्र सुरू झाले होते. महात्मा गांधींनी दोन गोष्टींची घोषणा केली. एक–मला हे स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते. आणि दोन राष्ट्रीय काँग्रेसचे ऐतहासिक कार्य संपले आहे. स्वतःला बरखास्त करावे व भारतीय जनतेच्या सामाजिक–आर्थिक स्वातंत्र्यासाठी सेवक म्हणून कार्य करावे.

एकाकी पडलेल्या व राजकीय स्वातंत्र्याच्या मर्यादा जाणलेल्या महात्मा गांधींची येथील हिंदु धर्मांध शक्तींनी हत्या केली. भारतीय जात–जमातवादी शक्तींची राजकीय इच्छा शक्ती येथेच बळावलेली दिसते.

यानंतर भारतीय राज्यघटनेचा मसुदा घटना समितीला सोपविताना या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एक इशारा दिला होता " राजकीय स्वातंत्र्याचा स्विकार आपण केला आहे. संसदीय लोकशाहीची चौकट अंमलात आणत आहोत. परंतु नजिकच्या काळात सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समता प्रस्थापित केली नाही तर हीच भारतीय कष्टकरी–दलित जनता ही राज्य-घटना जाळल्याशिवाय रहाणार नाही. "

एकीकडे धर्मनिरपेक्षता राज्यघटनेत नमूद करताना प्रत्यक्ष व्यवहारात मात्र आपल्या लाखो अनुयायांस बाबासाहेबांनी नागपूरला बौद्ध धर्माचा स्विकार केला आहे. वर्ण–जातीय विषमतेवर आधारलेला व लोकशाही विरोधी हिंदु धर्माचा त्यांनी त्याग केला आहे.

तर राजकीय जीवनात सर्व कष्टकरी–दलित जनतेची एकजूट साधून भारतीय रिपब्लीकन पक्ष उभारला पाहिजे व खऱ्याखुऱ्या राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक व आर्थिक स्वातंत्र्य व समतेसाठी लढा केला पाहिजे असे डॉ. आंबेडकर सांगत होते.

## भारतीय जनतेची पहिली राजकीय कृती –

पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली आपले मुलभूत प्रश्न निकाली

लागतील ही आशा कष्टकरी-दलित जनतेची मालवत चालली होती.

जागतिक मंदीची लाट-स्वातंत्र्यानंतरची निर्माण झालेली बेकारांची फौज चीन व पाकिस्तानची दोन अत्यंत महागडी पडलेली युद्धे, परिणामी संपूर्ण भारतीय' अर्थव्यवस्था खिळखिळी झाली होती. महागाई व जिवनावश्यक वस्तूंच्या टंचाईने आभाळ गाठले होते.

शहरी कामगार वर्ग व ग्रामिण भूमिहीन शेतमजूरांतील दलित-आदिवासीं-वरील अत्याचार वाढू लागले होते.

अशा या अभूतपूर्व राजकीय परिस्थितीत समाजवादी पक्षाचे नेते डॉ. राम मनोहर लोहियांनी 'संयुक्त विधायक दला'ची राजकीय भूमिका आम भारतीय जनतेसमोर मांडली. जातीनिती विषयी वेगळी व आग्रही भूमिका मांडणाऱ्या डॉ. लोहियांच्या या भूमिकेला भारतीय जनतेने तेवढ्याच जोमाने साथ दिली आणि स्वातंत्र्या नंतर अवघ्या दोन दशकातच उत्तर भारतातील अनेक राज्यात 'संविद' सरकारे अस्तित्वात आली. काँग्रेसचा पराभव झाला.

भारतीय जनतेच्या व विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या युवक-युवतींच्या पिढीमध्ये कमालीच्या आशाआकांक्षा पल्लवीत झाल्या होत्या. परंतु याला 'संविद' पुरेसे पडले नाही अल्पावधीतच ही सरकारे कोसळली. कोणताही पर्याय नसल्याने परत काँग्रेस सत्तेवर आली.

विरोधी राजकीय पक्षांवरील विश्वास यातून कमी व्हायला सुरुवात झाली होती.

नियोजनबद्ध पद्धतीने भांडवली विकासाचे सूत्र घेतलेल्या काँग्रेसने औद्योगिक क्षेत्रात आपली घोडदौड सुरु केली होती. मुंबई, पुणे, अहमदाबाद, मद्रास, दिल्ली, कलकत्ता सारखी महाकाय शहरे उदयाला येवू लागली. कामगारांच्या सघटीत चळवळी जोर धरू लागल्या.

ग्रामिण भागात 'हरित क्रांती' च्या नांवाने शेतीचा भांडवली विकास करण्याचे धोरण वेगाने राबविले जाऊ लागले. शहरांप्रमाणेच ग्रामिण भागातही हा सलग विकास होऊ शकला नाही. पंजाब, हरियाना, गुजरात, व महाराष्ट्रातील काही मोजकी 'हिरवी बेटे' यातून जन्माला आली. ऊस, ताग, गहू या पिकांना राजकीय महत्व आले. विकासाच्या या धोरणातून लाखो भूमिहीन शेतमजूरांचा वर्ग बिहार, उत्तर प्रदेशमधून पंजाब-हरियानात, राजस्थान मधून महाराष्ट्र - मध्य प्रदेशात, महाराष्ट्रातून प. महाराष्ट्र व सुरत, बऱ्हाणपूर (गुजरात व मध्य प्रदेश) आणि कोकणात जगण्यासाठी वर्षाचे आठ महिने जाऊ लागला. 'नवा भटका वर्ग' उदयाला

आला. हे सर्व दलित - आदिवासी - भटके - विमुक्त - बलुतेदार जाती-जमातीमधील आहेत.

स्वातंत्र्यानंतर केलेल्या सर्व भूमिसुधार कायद्यांचा सर्वात मोठा फायदा वरिष्ठ - मध्यम जातींना झाला. अगदी नगण्य संख्या दलित-आदिवासींची आहे. यातून मध्यम शेतकऱ्यांचा मोठा समूह उदयाला आला.

भांडवली उत्पादन व्यवस्था स्विकारीत असताना जुनी सरंजामी व वर्ण जाती व्यवस्थेतील मूल्ये–संस्कृती पूर्णतः सोडून हा नवीन शेतमालकांचा वर्ग उदयाला येत आहे असे दिसत नाही. जुने सरंजामी अवशेष जोपासतांना आपले वाडे शाबूत ठेवतच हा शेतकरी ट्रॅक्टर–मोटार सायकली–जिप्स खरेदी करतो आहे. मात्र सालदार--ड्रायव्हर आहे दलित, आदिवासी, भूमिहीन शेतमजूर !

कारखानदारीतून पुढे आलेल्या भांडवलदार वर्गाची नुसती नावे पाहिल्यास जुन्या व्यापारी व उच्च जातीमधून आलेला दिसतो.

वर्ण–जाती व्यवस्थेला आपल्यात सामावून घेऊन भारतीय भांडवलशाही नव्या स्वरुपात विकास करीत आहे. परिणामी औद्योगिक कामगार व ग्रामीण कष्टकरी शेतकरीं व भुमिहीन शेतमजूर सामाजिक, सांस्कृतिक दृष्टया एकजिनसी होऊन 'एकसंघ वर्गीय' शक्तीच्या स्वरुपात राजकीय क्षेत्रात अजून उभे ठाकलेले नाहीत.

शहरात कामगारांच्या वर्ण–जाती निहाय वस्त्या उभ्या ठाकल्या. मागून पोचलेला भटका–विमुक्तही नवीन वेगळी वस्ती करून राहू लागला. महानगर पालिकांमध्ये चतुर्थ श्रेणी सफाई कामगार म्हणून दलित जातीयच जात आहेत ग्रामीण भागात नवीन 'घरकुल' योजना राबविताना ती जाती निहायच राबविण्यात येत आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या 'हिरव्या बेटात' कुली गेट नावाने या सफाई कामगारांची वेगळी वस्ती बसलेली आहे. संचालक मंडळावर दलित प्रतिनिधींना शिरकाव नाही.

या दरम्यान स्त्री समूहाचे हाल असेच उत्तरोत्तर वाढत चालले आहेत. नवीन तंत्रज्ञान व यंत्राच्या नावाखाली स्त्री कामगारांची संख्या घटते आहे. अल्गल्प किंमतीत मिळणारी व कशीही राबविता येते म्हणून स्त्री शक्ती (श्रमशक्ती) कडे पाहिले जाते. साखर कारखान्यात आज स्त्री कामगार नाहीत. आहेत त्या २४ तास राबणाऱ्या ऊस–तोडणी व वहातूक कामगार म्हणून !

जिथे जिथे हिरवी बेटे उदयाला आली तिथे तिथे नवीन साखर कामगारांच्या वस्त्या आल्या. दुकानदारी आली. ढाबे आले. त्यासोबत वेश्या व्यवसायही मोठ्या प्रमाणावर स्थिरावू लागलाय !

## भूमिमुक्ती सत्याग्रहाचा अपवाद

कष्टकरी–दलितांच्या या परिस्थितीतून वाट काढण्यासाठी या दरम्यान दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली भारतीय रिप. पक्षाने भूमिहीन शेतमजुरांचा भूमिमुक्ती सत्याग्रह पुकारला. समाजवादी व साम्यवादी पक्षांनीही असे लढे दिले. परंतु हा अपवादच राहिला,

भारतीय कष्टकरी–दलितांच्या क्रांतीकारक एकजुटीतून येथील सामाजिक रचनेला धक्का लावण्याचे काम यानंतर काँग्रेसेतर राजकीय पक्षांकडून झाले नाही ही वस्तुस्थिती आहे.

दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली हा ऐतिहासिक लढा चालू असतानाच दलितांमधील दुसरा जागृत पण मध्यमवर्गीय गट त्याला विरोध करीत होता. प्रा. रावसाहेब कसबे याविषयी बोलतात, "एका बाजूने धोतराचा काचा मारुन दादासाहेब गायकवाड फाटके कपडे घातलेल्या, अनवाणी पायाने रस्त्यावर घोषणा देणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांचे नेतृत्व रस्त्यावर करीत होते तर एका हातात भारतीय राज्यघटना घेऊन आणि दुसऱ्या हाताने आपल्या नेकटायची गाठ वारंवार सारखी करीत दुरुस्त रिपब्लीकन पक्षाचे नेते दादासाहेब गायकवाडांचा आर्थिक प्रश्नांवरील संघर्ष घटनाबाह्य कसा आहे आणि ते कम्युनिस्ट कसे आहेत हे नरेपार्कवर जाहीर सभा घेऊन सांगत होते.

या दोन चित्रांचा अर्थ कसा लावायचा हा आजच्या दलित तरुणांपुढील प्रश्न आहे."

(दलित चळवळीची वाटचाल: रावसाहेब कसबे: पान ४३)

## अस्वस्थ करणारी वर्ण–जाती व्यवस्था

दादासाहेबांच्या हयातीत भा. रि. पक्षाची वाताहात झाली. सत्ताधारी काँग्रेस पक्षाने या पक्षाला आपली बटीक बनविण्याच्या कामी पूर्णपणे यश मिळविले. यातुन दलितांमधील नव सुशिक्षीत तरुणांची फळी अत्यंत संतप्त झाली होती. आग ओकण्याची संधी पहात होता.

तर दुसरीकडे डॉ. राममनोहर लोहिया वर्ण–जाती व्यवस्था व स्त्रीयांच्या गुलामीबाबत आग्रही निती मांडत होते.

" आजवर जाति मोडण्यासाठी झालेले प्रयत्न दीडमुखी होते. एक धार्मिक व अर्धा सामाजिक. सामाजिक क्षेत्रांत फक्त रोटी व्यवहाराचे प्रयत्न झाले. आता रोटी व्यवहाराच्या प्रयत्नाबरोबरच बेटी व्यवहाराचे प्रयत्नही झाले पाहिजेत. एक

सामान्यजनांचा प्रौढ मतदान अधिकार कायम ठेवण्यासाठी ( तो अधिकार काढून घ्यावा असा प्रचार काही लोक करीत असतात ) व त्यांना नोकऱ्या आदि क्षेत्रांत विशेष संधी देण्याकरिता केलेला राजकीय प्रयत्न आणि दुसरा मजुरी वाढवून मिळविण्याकरिता, बिन नफ्याच्या शेतीवरील सारा रद्द करण्याकरितां, जमिनीचे फेरवाटप इत्यादींसाठी करावयाचा आर्थिक प्रयत्न अशा प्रकारे धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा चारी बाजूंनी जातिप्रथेवर हल्ला चढविला तर ती नष्ट होण्याची आता थोडी आशा वाटू लागली आहे."

( जातिप्रथा : राममनोहर लोहिया : आंदोलन प्रकाशन : पान २० )

यासाठी देशव्यापी वैचारिक घुसळण व तगडे संघटन बनावे म्हणून डॉ लोहिया डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मद्रासचे द्रविड कळघमचे नेते रामस्वामी नायकर यांच्याशी संवाद साधत होते.

लोहियानंतर मात्र समाजवादी पक्षाने इतक्या स्पष्ट व आग्रहाने वर्ण–जाती व्यवस्थेविषयी भूमिका आणि कार्यक्रम घेतलेला दिसत नाही. परिणामी कष्टकरी दलित समूहांमध्ये आपला पाया मजबूत करण्याच्या कामी या पक्षाला फारसे यश आलेले दिसत नाही.

परिणामी या समाजवादी चळवळींतील काही कार्यकर्ते अस्वस्थ होते. नवा अन्वयार्थ लढ्याचा मार्ग–कार्यक्रम शोधत होते. सतरा–अठरा वर्षे कामगार चळवळीत काम केलेले व लोकसभेच्या निवडणुकात दोनदा उमेदवारी केलेले डॉ बाबा आढाव याविषयी लिहितात,

" लोकशाही समाजवादी मंडळींना आपली वैचारिक मांडणी नव्याने करावी लागेल. तिची निकड निर्माण झाली आहे. डॉ. राममनोहर लोहियांची 'जातिनीति' विसाव्या शतकातील सुरुवातीच्या सत्यशोधकासारखी होती. उत्तरेकडे तिलाही ब्राह्मण–ब्राह्मणेतरवादाचे स्वरूप आले. तामीळनाडूच्या द्रवीड मुन्नेत्र कळघमचे यशापयश नीटपणे तपासले पाहिजे. तंजावर जिल्ह्यातील किणवेण्णीच्या हरिजन शेतमजुरांच्या जाळपोळीने तेथेही प्रश्न निर्माण केलेले आहेत. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीने ब्राह्मणेतर पक्ष निर्माण झाला. मद्रास राज्यातही असा पक्ष होता. मद्रास व महाराष्ट्र या प्रांतांतील या पक्षांचे पुढारी अनेक वेळेस एकत्र झालेले आहेत. महाराष्ट्रात झालेला सत्तापालट वेगळ्या तऱ्हेने झाला... थोडक्यांत सांगायचे म्हणजे भारतातील सामाजिक, आर्थिक प्रयत्नांचे परिशीलन झाले पाहिजे; नवी भूमिका व नवी दिशा निश्चित केली पाहिजे."

( एक गाव एक पाणवठा : बाबा आढाव, पान २०१ )

विविध मार्क्सवादी पक्ष भारतीय वास्तवाचा त्यातील गुंतागुंतीचा अन्वयार्थ लावण्यात यशस्वी होताना दिसत नाहीत. मार्क्सवादी विश्लेषण पद्धती स्विकारून भारतीय वास्तवाचा अर्थ लावणे व भारतीय वास्तव मार्क्सवादी सिद्धांत आणि धोरणाच्या व्यवहारी चौकटीत कोंबणे या दोन मूलभूत भिन्न बाबी आहेत. यात अजूनही गल्लत चालू आहे. त्यामुळे कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली साम्यवादी क्रांती घडवून आणणारे अग्रदल म्हणजे साम्यवादी पक्ष बाकी सर्वजण सुधारणावादी दुरुस्तीवादी व प्रतिक्रांतिकारक ही भूमिका घेऊन एकाच तत्त्वज्ञानाला मानणाऱ्या मार्क्सवाद्यांचे सर्वात जास्त राजकीय पक्ष-गट निर्माण का झाले ? याचे उत्तर या वैचारिक चौकटीच्या बाहेर जाऊन शोधायला आताशी कुठे सुरुवात झाली आहे.

सत्यशोधक कम्यु. पक्षाचे सरचिटणीस कॉ. शरद पाटील आपल्या ' नव्या धोरणासाठी संघर्ष ' करताना लिहितात,

" भारतीय इतिहास, तत्त्वज्ञान व प्रचलित समाजव्यवस्था यांचे पारंपारिक वर्गीय दृष्टिकोनातून विवरण करण्याऐवजी वर्गीय जातीय दृष्टिकोनातून विवरण करणारे नवे धोरण अन्वेषणात्मक व राजकीय कम्युनिस्ट चळवळीत उदयास आलेले आहे.

डांगे, कोसंबी, चनाना, रामशरण शर्मा, मोहंमद व इर्फान हबीब यांसारखे मार्क्सवादी इतिहासतज्ञ आणि राहुल सांस्कृत्यायन व देवीप्रसाद चटोपाध्याय यांसारखे मार्क्सवादी तत्वज्ञ अनुक्रमे भारतीय इतिहास व तत्वज्ञान यांची याच पारंपारिक दृष्टिकोनातून मीमांसा करीत आले आहेत. भारतीय कम्यु. पक्षाचे एक नेते प्रभाकर वैद्य हे पहिले मार्क्सवादी आहेत की ज्यांनी आपल्या 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा' या वैशिष्टयपूर्ण पुस्तकाद्वारे नव्या धोरणाचा पुरस्कार करून वर्गलढा व जातिलढा यांचा समन्वय करणारे क्रांतिकारी आंदोलन उभारायची गरज प्रतिपादली.

पण सर्वात उल्लेखनीय आहे गेल ओमवेद यांचे 'कल्चरल रिव्होल्ट इन ए कलोनिअल सोसायटी, द नॉन ब्राह्मण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया : १८७३ ते १९३०' समारोपात हे पुस्तक म्हणते की, वर्गलढा व जातिलढा यांचा समन्वय करणारे क्रांतिकारी आंदोलन तेव्हाच उभारले जाऊ शकेल जेव्हा ही कामगिरी आजच्या उच्चभ्रू नेतृत्वाकडून मागासलेल्या कार्यकर्त्यांवर सोपविली जाईल. "

( नव्या धोरणासाठी संघर्ष : सकप प्रकाशन : पान ४७ )

## बिगर संसदीय राजकीय चळवळींचा उदय

संसदीय राजकारण हेच सर्वस्व मानलेल्या सर्वच राजकीय पक्षांतर्गत व

बाहेर मोठ्या घडामोडी घडत होत्या. राज्यसंस्थेकडे पहाण्याचा नवा दृष्टिकोण घेऊन हातात शस्त्रे घेऊन मार्क्सवादी-लेनिनवादी - माओवादी गट देशभर सक्रिय झाले होते. 'नक्षलवादी चळवळ' म्हणून तिचा उल्लेख होवू लागला. हिचा प्रामुख्याने पाया होता दलित-आदिवासी-भूमिहीन शेतमजुरांचा. परंतु वर्ण - जाती व्यवस्थेच्या संदर्भात मांडणी करणे त्यांना चुकीचे वाटतेय.

समाजवादी पक्षातून अलग झालेले डॉ. बाबा आढाव सत्यशोधक चळवळीकडे वळले तर हमीद दलवाईंनी मुस्लिम सत्यशोधक चळवळ सुरु केली.

याच दरम्यान फ्रांसमध्ये विद्यार्थ्यांनी राजकीय उठाव केला होता. यातून राजकीय पक्षांपासून अलग पडलेल्या व नवीन वाटचालीचा शोध घेणाऱ्या भारतीय युवकांना यातून नवा मार्ग सापडला. विद्यार्थी-युवक हाच क्रांतीचा अग्रदूत अशी उत्साही भूमिका घेऊन तो रस्त्यात आला. महाराष्ट्रात अगोदर युथ ऑर्गनायजेशन व नंतर युवक क्रांतीदल नांवाने पुढे आलेल्या युवक विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या चळवळी याचाच एक भाग होता.

आपल्या विद्यार्थी युवक-युवतींच्या चळवळींचा अनुभव डोळसपणे घेतल्यावर युक्रांदने आपली मूलभूत भूमिका जाहिर केली. संम्यक् समाजवादी क्रांती हा संकल्प केला. आपल्या मूलभूत भूमिकेत युक्रांद म्हणते, 'भारताचा विचार करता भारतातील समाजवादी क्रांतीचे नेतृत्व जातिविहीन, वर्गविहीन समाजरचना निर्माण करणाऱ्या कार्याला बांधलेल्या दलित जातीच करतील असे युक्रांदचे ठाम मत आहे. भारतात जोपर्यंत राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अन्यसत्ता आणि सत्तास्थाने क्रांतिशील समाजवादी दलित जातींकडे जात नाहीत तोपर्यंत भारतातील समाजवादी क्रांतीला प्रारंभ सुद्धा झाला आहे, असे युक्रांद मानत नाही." (युक्रांदची मूलभूत भूमिका पान ८:६)

भा. रिप. पक्षाच्या कॉंग्रेस धार्जिण्या व मध्यमवर्गिय धोरणाचा परिणाम म्हणून फुले-आंबेडकरी विचाराचा वारसा घेऊन नवसुशिक्षीत संतप्त दलित युवकांनी या पारंपारिक नेतृत्व व पक्षांविरुद्ध विद्रोह पुकारला. देशभर दलित जातींवरील–भूमिहीन शेतमजूरांवरील सामूहिक हल्ले वाढत चालले होते. स्त्रियांवरील अत्याचार टोकाला गेले होते. हिरव्या क्रांतीतून उदयाला आलेला सधन शेतमालकांचा वर्ग जुन्या सरंजामी थाटासह वर्ण-जातीव्यवस्थेचा आधार घेऊन हे हल्ले करु लागला.

बावडा व ब्राह्मणगावच्या दलित स्त्रीची नग्न धिंड या प्रातिनिधिक प्रकरणांतून या परिस्थितीचे बेंड फुटले. 'ढाले लेख' प्रकरणातून याच्या विद्रोही वैचारिक संघर्षाला सुरुवात झाली. कम्युनिस्टांच्या बालेकिल्ल्यात नायगाव व वरळीला

कॉ. एस. ए. डांगे यांच्या नेतृत्वाखाली लाखो गिरणी कामगारांचा संप चालला होता. त्याचवेळी सवर्ण–दलित दंगलीने पेट घेतला. याच वणव्यातून भारतीय दलित पँथरचा जन्म झाला. महाराष्ट्रासह अनेक राज्यातील नवीन दलित युवक या पँथरच्या झेंड्याखाली आपली असंतोषाची आग ओकू लागला,

संपूर्ण महाराष्ट्र १९७२ च्या दुष्काळाने आधीच होरपळून निघाला होता. डॉ. बाबा आढावांच्या नेतृत्वाखाली राज्यभर 'एक गाव एक पाणवठा' चळवळ आकार व वेग घेऊ लागली होती. मजुरांच्या चळवळीमुळे व सत्ताधारी वर्ग जातींची गरज म्हणून अशावेळी 'रोजगार हमी योजना' आणली गेली. जमीन हस्तांतर व जंगलाच्या प्रश्नावरून देशभर आदिवासी चळवळीने आपला आवाज बुलंद केला होता. नवे नेतृत्व पुढे येत होते. या सर्व असंतोषाचा वणवा महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यात पसरू नये म्हणूनच 'रोहयो' आणली गेली.

## गुजरात–बिहारचे नवनिर्माण आंदोलन व आणीबाणी

गुजरातमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींनी सुरू केलेली चळवळ नवनिर्माणापर्यंत पोहोचली. लोकनायक जयप्रकाश नारायण या लढ्यात उतरले. पाठोपाठ बिहारचा युवक–विद्यार्थी-विद्यार्थिनी उतरल्या. भ्रष्ट व जातीयवादी काँग्रेस सरकारांच्या विरोधी जनआंदोलन म्हणून ते देशभर पसरू लागले. महाराष्ट्रातही संतप्त विद्यार्थी-युवक–युवतींनी विकासाच्या प्रश्नावर संपूर्ण मराठवाडा पेटवला.

या वणव्यात १९७१ चा इंदिरा काँग्रेसचा गरिबी हटावचा नारा बेचिराख झाला होता. बांगला युद्धाची पुण्याई करपून गेली होती समाजवादी नेते साथी जॉर्ज फर्नांडीस यांच्या नेतृत्वाखाली १९७४ ला ऐतिहासिक रेल्वे संपाचे युद्ध झाले. स्वातंत्र्योत्तर काळात कधी नव्हती एवढी भारतीय अर्थव्यवस्थेची घडी मोडली. यात भर पडली अलाहाबादच्या कोर्टाच्या निकालाची.

देशभरचा हा जनतेचा उठाव दाबण्यासाठी अखेर इंदिरा गांधींनी २६ जून १९७५ ला आणीबाणी घोषित केली. एकाधिकारवादी काँग्रेस पक्षाने पंतप्रधानांच्या या कृतीचे समर्थन केले. तमाम कष्टकरी–दलितांचे उरले सुरले मूलभूत हक्क हिरावून घेतले गेले. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्यासह हजारो राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले गेले.

## भारतीय जनतेची दुसरी राजकीय कृती

या आणीबाणी विरोधी देशभर व बाहेर उघड वा गुप्तपणे लढे सुरु झाले. सर्व सामान्य जनता हळूहळू या लढ्यात येऊ लागली. स्वातंत्र्य लढ्यातून सजग झालेल्या लोकशाहीच्या जाणीवा पोलिस व सैन्याच्या जोरावर चिरडून टाकणे अवघड अस-

त्याचे इंदिरा गांधी व पक्षाने हेरले. अखेर जानेवारी १९७७ मध्ये आणीबाणी मागे घेतली गेली. निवडणूकांची घोषणा झाली. निव्वळ आणीबाणीतून जन्माला आलेला जनता पक्ष सत्तेवर आला. अन्य कोणताच क्रांतिकारक पर्याय नव्हता म्हणून जनतेने इंदिरा कॉंग्रेस विरोधी मतदान केले होते. आणीबाणी विषयक घटना दुरुस्ती करुन ऐतिहासिक कार्य संपुष्टात येताच जनता पक्षाचे सरकार कोसळले. भारतीय जनतेने आपल्या राजकीय जाणीवांचे हे दुसऱ्यांदा स्वरुप दाखविले होते. विरोधी पक्ष ते पेलायला अयशस्वी ठरले.

जनता पक्ष हे राजकीय हत्यार बनू शकत नाही हे दिसताच त्याविरोध मतदान करुन परत इंदिरा कॉंग्रेसला निवडून दिले गेले.

या निमित्ताने समाजवादी पक्ष व चळवळीने आपले ऐतिहासिक राजकीय अस्तित्व नष्ट करुन सत्ता हेच सर्वस्व मानण्याच्या आहारी हे पक्ष किती गेले होते याचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले !

या सर्व राजकीय घडामोडीतून विरोधी व डावे पक्ष राजकीय शहाणपण शिकतील ही आशा करणे चुकीचे होते. उलट जयप्रकाशजींनी जनता पक्ष सत्तेवर येताच बाहेर ' छात्र युवा संघर्ष वाहिनी ' व 'लोकसमिती' ची गरज सांगितली. या संघटना जनतेमध्ये राहून क्रांतिकारक जाणिवा सजग ठेवण्याचे व सत्तेवर अंकुश ठेवण्याचे काम करतील अशी भूमिका होती.

## आंतरराष्ट्रीय महिला वर्ष व स्त्रीमुक्ती चळवळ

१९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित झाले. जगभर व भारतभर स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा होऊ लागली. स्त्रियांचे स्वतंत्र संघटन व लढे उभे राहू लागले. ' टुवर्डस इक्वॅलिटी ' (समतेकडे) हा भारत सरकारच्या वतीने स्त्रियांच्या परिस्थितीवरील पहिला अहवाल प्रसिद्ध झाला. परत एकदा विविध राजकीय पक्ष व संघटनांमध्ये स्त्रियांच्या प्रश्नावर वाद झडू लागले.

## साहित्य–शास्त्र–नाट्य चळवळ

या सर्व उलथापालथीचा परिणाम पारंपारिक साहित्य-शास्त्र व नाट्य चळवळीवर झालेला आहे. उत्तरेकडे जनवादी-विद्रोही साहित्य तर महाराष्ट्रात दलित साहित्य व नाट्य चळवळीने जोर पकडला. कष्टकरी–दलित–भटके–विमुक्त या खालच्या सामाजिक-सांस्कृतिक थरातून लेखक-साहित्यीक-विचारवंत-कलाकार पुढे येवू लागले.

## या कालखंडाचा अन्वयार्थ काय व कुठे लावायचा ?

अवघे जनजीवन या कालखंडात हाललेले दिसतेय. याचा समग्र अन्वयार्थ

लावायचा कसा ? राजकीय पक्षांची जागा कुठे होती ? राजकीय सत्ता बदल व सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक बदल याचा परस्पर संबंध काय ? वर्ण-जाती व्यवस्था व स्त्री गुलामीचेच प्रश्न या कालखंडात का उभरुन आले. ?

वर्ण-जाती-व्यवस्थेचे स्वरुप कसे व कोणत्या विश्लेषण पद्धतीने समजून घेणार ? फुले-शाहू-आंबेडकर लोहिया पेरियार-गांधी तर मार्क्स-एंगल्स-लेनिन माओ-चे-गवेरा यांच्या लढ्यांचा-तत्त्वज्ञानाचा-सिद्धांतांचा-रणनितीचा नेमका अर्थ काय ? यात समन्वय होवू शकतो का ? की विरोधच संभवतो ? भारतीय सम्यक समाजवादी क्रांतीची वाटचाल कशी होणार आहे ? सांस्कृतिक क्रांतीचे नेमके स्थान काय ? वर्गलढा व वर्णलढा यांचा परस्पर संबंध काय ? आदी शेकडो प्रश्न राजकीय भूपृष्ठावर तरारून आले होते.

या प्रश्नांच्या सागरात वावरत असताना एक जाणीव प्रकर्षाने या प्रश्नांची जाण असणाऱ्या कार्यकर्त्यांना झाली. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्रिया आदी कष्टकरी समूहांमध्येच भारतीय समाजवादी क्रांतीची वाट सापडणार आहे. तीच खरी क्रांतीकारक शक्ती आहे.

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आवश्यक असलेला वैचारिक खुलेपणा राजकीय पक्षांकडे नव्हता. किंबहुना पक्ष म्हणून त्यांना असले क्षुल्लक प्रश्न पडलेच नव्हते ! बिगर संसदीय परंतु राजकीय संघटना. गट यांना स्वतःच्या मर्यादा आणिबाणीने दाखवून दिल्या होत्या. अशावेळी सर्वांना सामावून घेईल, परस्पर विश्वास देईल, आतापर्यंतच्या अनुभवांची देवाण घेवाण होईल, त्यांचे सामुहिकपणे मूल्यमापन होईल; अशा एका सामाजिक व्यासपिठाची ऐतिहासिक व राजकीय गरज निर्माण झाली होती या अचुक वेळी 'विषमता निर्मूलन समिती' स्थापन झाली.

## 'विनिशि' कडे वळून पहाताना

'विनिशी'च्या या ऐतिहासिक वाटचालीला दहा वर्षे होत आहेत. महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व संघटना व राजकीय पक्षांचे (भाजप व अभाविप वगळून) कार्यकर्ते या शिबिरातून येऊन गेले आहेत. फार मोठी संख्या भरेल यांची. मुंबई, नागपूर, कोल्हापूर, बारामती महाराष्ट्रातील अशा सर्व अर्थाने महत्त्वाच्या ठिकाणी ही शिबीरे झाली.

दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, बलूतेदार, स्त्रीया, देवदासी, अपंग, भूमिहीन शेतमजूर आदी तळच्या व दुर्लक्षीत समूहांवर या शिबीरांमधून विचार विनिमय झाला. काम करताना झालेले विदारक अनुभव पुढे आले. भारतीय

वास्तवातील भिषणता दरवेळी कळत गेली. कार्यकर्ते, त्यांचे क्षेत्र, चळवळ, कार्य-पद्धती, भौगोलिकता आदी महत्त्वाच्या बाबी यातून कळत गेल्या. कार्यकर्त्यांचे व्यक्तीगत जीवन समजू लागले. त्यांच्या अडचणी व प्रश्नांची प्रकर्षाने जाणीव होवू लागली. अशा परिस्थितीत अत्यंत प्रतिकूल वातावरणात हे सर्व कार्यकर्ते पाय रोवून, ताठपणे आपापल्या क्षेत्रात उभे आहेत हे जाणवत होते. त्यातून मनातली हिरवळ आणखी तरारत होती.

एक गाव एक पाणवठा, नामांतर व मंडल आयोग प्रश्नावरील लढ्यात हे सर्व कार्यकर्ते मनापासून राबले. कोपरगांवचा हरिनाम सप्ताह विरोधी विज्ञान-निष्ठ समतावादी कृती समितीचा सत्याग्रह, आळंदीचा सत्याग्रह, पुण्याच्या पु. भा. भावे अध्यक्ष असलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातील संतप्त निदर्शने, आदी प्रासंगिक कार्यक्रमात सर्वजण सहभागी झाले.

नामांतरविरोधी हत्याकांडाने येथील वर्ण–जातीयवाद्यांचे हिंस्त्र व भयावह स्वरुप प्रत्यक्ष अनुभवास आले. गुजरात, बिहार व आता कर्नाटक, आंध्र याची वारंवार आठवण करुन देत आहेत.

या दोन दशकात जसजशा चळवळी तळागाळात जायला लागल्या तसतशी ब्राह्मणेतर समाजातील कनिष्ठ मध्यम, दलित, भटके विमुक्त, आदिवासी जाती–जमातीमधील व कामगार, गरिब शेतकरी–भूमिहीन शेतमजूर वर्गातील स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांची संख्या वाढताना दिसतेय. लातूर व नागपूरची शिबीरे याची चांगली उदाहरणे आहेत. या विविध सामाजिक–सांस्कृतिक–आर्थिक थरातून आलेले तरुण कार्यकर्ते ही या चळवळीची अमूल्य मिळकत आहे. या कार्यकर्त्यांसमवेत तीन दिवस वावरणारे विचारवंत, साहित्यीक, कलाकार, नेते यांची नुसती नावे वाचली तरी ऊर भरून येईल असे चित्र दिसते.

नामांतर लढा हे या सर्व कार्यकर्त्यांच्या सामूहिक कृतीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

' विनिशि ' हे सर्वांचे माहेर झाले होते !

वर्ण–जाती व्यवस्थेविरुद्ध सतत बोलत व काही कृती करीत राहिल्याने विशेषत: एक गाव एक पाणवठा, नामांतर व मंडल आयोग लढ्याने येथील साम्य-वादी पक्ष या प्रश्नावर लिखाण करायला लागले आहेत. वर्ण–जाती–धर्म हा समाजाच्या इमारतीचा वरचा इमला मानणाऱ्या मार्क्सवादी सिद्धांताची चिकित्सा सुरू झाली. डाव्या विचारांतर्गत प्रवाहीपणा घडवून आणण्यात विनिशि, लवकीनच यश आले.

परंतु त्याच वेळेला काही गोष्टी नजरेतून सुटत नव्हत्या.

लातूर-नागपुर शिबिरानंतर कार्यकर्त्यांची संख्या घटत गेली. प्रथमपासूनचे सक्रिय असलेले व इतर क्षेत्रातील सहकारी येईनासे झालेत.

काही संघटना व काही राजकीय पक्षांची अनुपस्थिती जाणवू लागली.

दलित संघटना फारशा जवळ आल्या नाहीत. परंतु दलित युवक आघाडी, सामाजिक समता समिती नागपूरसारख्या सहकारी संघटनांची उपस्थिती कमी होत गेली.

विषयांची यादी वाढत गेली. माहिती तपशील खूप मिळत गेला. पण विषयांची खोली गाठण्याऐवजी ती वरवरची चर्चा जाणवू लागली.

अनुभवांची संख्या प्रचंड झाली, ती स्वाभाविक होती, पण त्या अनुभवांचा

अर्थ शोधण्यासाठी लागणारी तटस्थवृत्ती दिसेनाशी झाली.

ज्या उद्दिष्टाने 'विनिशि' ला सुरुवात झाली, ती उद्दिष्टये व 'विनिशि'चा व्यवहार तपासण्याचे काम फारसे होताना दिसेना.

तत्त्वज्ञान-तत्त्वविचारसरणी व अनुभव यांची सांगड घालण्याचा प्रयत्न होताना दिसत नाहीत. वैचारिक बंदिस्तपणा व उदासिनता जाणवते आहे.

'माहेर' ला येण्यातील ओढ कमी होताना दिसते आहे.

या सर्व वाटचालीतील एक प्रमुख सहकारी डॉ. बाबा आढाव यांच्याच शब्दात सांगायचे तर ते ज्यावेळी समाजवादी पक्षात सक्रिय होते त्यावेळी वर्ण–जाती व्यवस्थेविरोधी कार्यक्रम जोरात घेतले जात होते. बाबा आढाव आपल्या 'एक गाव एक पाणवठा' पुस्तकाच्या 'सुरुवात' मध्ये लिहितात, "महाराष्ट्रामध्ये 'समता दिंडी', 'समता पदयात्रा', 'समता सायकल फेरी' असे विविध उपक्रम समाजवादी पक्षाने पुरे केले. परंतु त्याचेही स्वरुप शेवटी कर्मकांडासारखेच होऊ लागले. प्रश्नांची जाहीर चर्चा व्हावी हे उद्दीष्ट ठीक. परंतु चर्चा कोणत्या वर्गात व कोणाशी ? ज्यांना हा विचार मान्य आहे त्यांनीच एकत्र जमून 'श्रद्धांजली' वाहायची की काय ? अशावेळी मला विलक्षण गुदमरल्यासारखे होई. जनसामान्याबरोबर सवाद होणे व त्यांना विशिष्ट भूमिका घ्यायला भाग पाडणे हा भाग पूर्ण झाला नाही तर असले परिश्रम वाया जातात असे मला वाटे" (पान ७–८)

'विनिशि' मध्ये आतापर्यंत येऊन गेलेल्या सहका-यांशी बोलताना अगदी हेच जाणवले. माझ्याही मनाची हीच तगमग चाललीय राबणाऱ्या आपणा सर्व सहकाऱ्यांचे कष्ट वाया जात आहेत. 'विनिशि' चे कर्मकांड होऊ नये. तो कुंभ-

मेळा बनता कामा नये.

सध्या देशभर जात–जमातवादी शक्तींनी थैमान घातले आहे. कधी नव्हता एवढा संघटीतपणे हिंदु अतिरेकी वाद उफाळून आला आहे. गावोगाव या शक्ती पसरल्या आहेत. या परिस्थितीत ' विनिशि ' ची भूमिका (रोल) काय ? आज-पर्यंतचे प्रयत्न वाया जातात की काय अशीच भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. याचा विचार ' विनिशि ' करीत आहे असे दिसत नाही.

आतापर्यंत एकत्रीतपणे व अलगपणे केलेल्या वाटचालीचा सामूहिकपणे आढावा कधी घ्यायचा ? बाह्य वास्तव, चळवळीतील अनुभव व 'विनिशि'तील विषय मांडणी यांची कुठे गाठभेट होते का ? हे प्रश्न सतत भेडसावत असतात.

## विनिशि व इतर व्यासपीठे

दलित - आदिवासी - भटके - विमुक्त - बलूतेदार - स्त्रिया - देवदासी - धरण-ग्रस्त, हमाल, मापाडी, चाळणा महिला कामगार, रोजगार हमी मजूर, भूमिहीन शेतमजूर आदी समूह या दोन दशकामध्ये विशेष जागृत झालेले दिसतात. 'विनिशि' चा व्यापक परिणामही याला थोडाफार कारणीभूत आहे

या जागृत समूहांच्या त्यांच्या स्वतंत्र्य संघटना, लढे उभे रहात आहेत. समान कार्यक्रमासाठी ते एकत्र येत आहेत. त्या प्रश्नांवरील व्यासपीठे तयार होत आहेत उदा. रोजगार हमी कामगार समन्वय समिती, जमिनीच्या प्रश्नावरील महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती, धरणग्रस्त शेतकरी परिषद, हमाल-मापाडी महामंडळ, लोक विज्ञान संघटना, स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समिती, अंधश्रद्धा निर्मूलन समिती इ.

अशी मोठ्या प्रमाणावर काही निश्चित भूमिकेवर होणारी व्यासपीठे हे राजकीय प्रवाही पणाचे लक्षण आहे.

'विनिशि' चे एक प्रमुख व प्राथमिक उद्दिष्ट या निमित्ताने परस्पर पूर्ण केले जात आहे. या व्यासपीठांवर 'विनिशि' मधीलच कार्यकर्ते, संघटना असतात. तिथे त्यांची ओळख, अनुभव कथन होत असते. आता या 'विनिशि' च्या व्यासपीठावर या अनुभवांची देवाणघेवाण झाल्यावर त्यांचे तटस्थपणे, परस्पर विश्वास ठेवून एकमेकांची भूमिका समजून घेऊन विश्लेषण, अन्वयार्थ लावायची गरज आहे. यातून सिद्धांतनाकडे गेले पाहिजे.

बारामतीच्या ११ मे १९८४ रोजी 'विनिशि'च्या चर्चेसाठी प्रा. गं. बा. सरदार यांनी 'परिवर्तनवादी शक्तींची एकजूट' या विषयांवर एक टिपण सादर

केले. त्यात प्रा. सरदार म्हणतात, "एका विशिष्ठ परिस्थितीत कार्य करणाऱ्या माणसांच्या अडचणींची आणि त्यांना जाणवणाऱ्या ताण-तणावांची दुसऱ्या परिस्थितीतील कार्यकर्त्यांना बरोबर कल्पना येत नाही. त्यासाठी परभूमिका प्रवेशाची कला आपण अवगत करून घेतली पाहिजे."

## अनुभववादाला प्रोत्साहन

एकमेकांची भूमिका समजून घेण्याच्या बाबतीत 'विनिशि' मध्ये कमालीचा हळवेपणा आला आहे. समजून घेऊन चर्चा करण्याच्या आतच कोणत्यातरी वादाचे 'लेबल' लाऊन मोकळे होण्याचे प्रकार वाढताहेत. वास्तविक 'विनिशि' हे पुरोगामी विचारांच्या व्यक्तींची, संघटनांची संयुक्त आघाडी आहे. लोकशाही समाजवाद, मार्क्सवाद, आंबेडकरवाद, मार्क्स–लेनिन–माओवाद वा अन्य रूढ वादांपैकी कुणाचाही 'विनिशि' ने स्विकार केलेला नाही.

'समा'च्या मे १९८४ च्या अंकातील संपादकीयात लिहिल्याप्रमाणे, "पारंपारिक डावे पक्षांच्या संसदीय व अर्थवादी राजकारणाला विटलेल्या तरुणांचे व संसदबाह्य दलित दलितेतर संघटनांचे विनिशि हे जातिव्यवस्था अंताच्या तात्त्विक व व्यावहारिक विचारमंथनाचे केन्द्र बनले."

विशिष्ट 'राजकीय वाद' नको म्हणजे निव्वळ 'अनुभववाद' असा काहीसा प्रकार दिसतोय. विनिशिला जमणाऱ्या दलित-आदिवासी-भटके-विमुक्त–बलुतेदार स्त्रिया आदी समूहातील गरिब शेतकरी–भूमिहीन शेतमजूरांमध्ये राबणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांच्या जिवंत, दाहक अनुभवातून येथील वर्ण–जाती व्यवस्थेचे स्वरूप समजून घ्यायला हवे होते. त्यासाठी आवश्यक त्या विश्लेषण पद्धतीचा सामूहिक शोध यातूनच घ्यायचा होता. येथे पुस्तकी ज्ञान आपण टाकाऊ मानत नाही.

आल्बर्ट आइनस्टाईन म्हणतो, "ज्ञान हे दोन स्वरूपात असते. एक निर्जीव, पुस्तकांमध्ये साठवलेले आणि दुसरे जिवंत लोकांच्या जाणिवेमध्ये आणि तसे पाहिले तर दुसरे स्वरूप हेच खरे महत्वाचे; पहिले स्वरूप कितीही टाळता येत नसले, तरी त्याचे स्थान शेवटी दुय्यमच."

अनुभवांच्या कसोटीवरच हे पुस्तकी ज्ञान–सिद्धांत पडताळून पहायचे असतात. नेमकी हीच प्रक्रिया न घडविल्याने 'निखळ अनुभववाद' प्रवृत्ती विनिशि मध्ये दिसू लागली. वास्तविक ही प्रवृत्ती पारंपारिक ब्राह्मणी संस्कृतीचे अपत्य आहे. अनुभव व ज्ञान आणि त्यातून सिद्धांतन ही वर्ण–जाती व्यवस्थेमध्ये एकमेकांपासून तोडलेली होती. प्रत्यक्ष राबणाऱ्या कार्यकर्त्यांनीच स्वतःचे वाचन, चिंतन व त्यातून तात्त्विक मांडणी करण्याची जबाबदारी स्विकारली पाहिजे.

परस्पर संवाद–लिखाणाची भाषा जरुर सोपी हवी. वास्तविक कॉ. शरद पाटील यांच्या भाषेविषयी ही तक्रार बारंवार येत असते. पण भाषा कळत नाही म्हणून तो विचारही समजून–ऐकून घ्यायचा नाही हे दुसरे टोकही चुकीचे व आत्मघातकी आहे. कोल्हापूर विनिशि मध्ये याचे अत्यंत वाईट स्वरूप पहायला मिळाले.

ज्या ब्राह्मणशाही व ब्राह्मणी संस्कृतीने स्वतःचा वैचारिक व भौतिक आधार देऊन वर्ण–जाती व्यवस्था रुजविली. तिला उखडू पहाणाऱ्या आपणा सर्व शूद्रादी-शूद्रांची बाजू घेणाऱ्या व त्यामधून आलेल्या कार्यकर्त्यांना कमालीचे विकसीत व्हावे लागणार आहे. भाषा कळत नाही, चर्चा नको, शब्दांचा कीस नको ही तक्रार करायला आपणाला जागा नाही.

## राबणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच व सामूहिकपणाची गरज

विनिशि हे आपले माहेर. एकमेकांची विचारपूस, पाठ थोपटणे, गोंजारणे तर आलेच. किंबहुना हा मायेचा ओलावा असतो म्हणूनच माणूस माणसाशी बोलतो रडतो–नाचतो–गातो. वेळप्रसंगी रागावतोही. एकमेकाला समजून घेऊन त्याच्याशी वैचारिक मतभेद असतील तर तेही सांगण्याचा तेवढाच अधिकार एकमेकाला दिलेला असतो. म्हणून हा माहेरचा परिवार पण 'राजकीय परिवार'. याचे भान कदापिही सुटू देता कामा नये. पूर्ण खात्री होईपर्यंत व संवाद कोणत्याही परि-स्थितीत न तोडता कुणाच्याही राजकीय चारित्र्याविषयी–प्रामाणिकपणाविषयी शंका अशा व्यासपीठावरून घेता कामा नये. कमालीची सोशिकता व मनाचा मोठे-पणा स्विकारावा लागणार आहे.

विनिशिच्या आत बाहेरचे कार्यकर्ते रावसाहेब कसबे, अरुण कांबळे, रझीया पटेल, भिमराव म्हस्के, राजेंद्र मानव, अमर हबीब, मंगल खिवसरा, सय्यदभाई, सकीना बोहरा, काळुराम दोधडे, लहू कानडे, मोतीराज राठोड, राम दुतोंडे, वसुधा सरदार, आसाराम गुरुजी, सुरेश पगारे, कुमार शिराळकर, वीरसींग पाडवी, सुभाष लोमटे, प्रभा नारकर, प्रविण वाघ, अशोक थूल, रामदास आठवले, लक्ष्मण माने, ज्योति कोटमकर, एल्. डी. भोसले, हरिभाऊ तेलंग, रशीला मेहता, निलम गोऱ्हे, संजय पवार, प्रतिमा जोशी, विद्या कुलकर्णी, शैला सातपुते, जयदेव गायकवाड, नामदेव माळी, निलम परुळेकर, ज्योती केळकर, रमाकांत पाटील, सुरेखा दळवी, विद्युल्लता पंडित, कला राठोड, लता सूर्यवंशी, अविनाश डोळस, साहेबराव गायकवाड, विजयकुमार गवई, मधु गायकवाड, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, माधव मोरे, जोगदंड, रंगा राचुरे, संदीपान बडगिरे, यशपाल सरवदे, भाग्यवती बजाज, निशा हातिसकर, प्रकाश कांबळे, निशा शिवूरकर, टी. एम्. कांबळे, नरेंद्र गायक-

वाड, शिवाजी गायकवाड, स्नेहल नेने, मोहन नारकर, राजीव पाटील, बहारू सोनावणे, नजूबाई गावीत, प्रकाश सिरसाट, भिमराव जाधव, मोहन गुंजाळ. अर्जुन कोकाटे, मधु मोहिते, पार्थ पोळके, अशोक सासवडकर, विजय सिन्हा, विजय मांडके आदि सहकारी व आज आपल्यात नसलेली नयना कुलकर्णी, मुमताज रहमतपुरे, नारायण फडतरे, गुलाबसिंग ठाकरे, ज्या वेगाने या प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आले व आपल्या सोबत एका समूहाला संघटीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत' या सगळ्यांकडे नजर टाकल्यावर आपली छाती फुलून आली पाहिजे.

'विनिशि' सारख्या व्यासपीठावर आपल्या प्रश्नांचा सामूहिकपणे शोध घेताना एकमेकांची भूमिका चळवळ, कार्यपद्धती समजून घेताना एकमेकांचे कौतुक केले पाहिजे. त्यातून आत्मसंतुष्टता येता कामा नये. सतत चळवळीचे, व्यक्तीचे अपुरेपण जाणवत गेले पाहिजे. त्यातूनच पूर्णत्वाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा मिळत असते.

सत्य कुणा एका पक्ष, संघटना, गट वा व्यक्तीला गवसले आहे असा दावा करून इतरांच्या भूमिका, प्रयत्न यांची कुचेष्टा करणे हा राजकीय बुवाबाजीचा प्रकार आहे. अंतिम सत्य असे कुणा एकाला सापडत नसते. प्रत्येकाच्या अविरत कष्टातून सत्यांश मिळत असतो. हे जाणून सामूहिकपणे वाटचाल करण्यातच पूर्ण सत्याकडे जाण्याचा मार्ग सुकर व अचूक असण्याची शक्यता अधिक असते.

यातून परस्परांची भूमिका, कार्यपद्धती विकसीत होत जातेच. पण त्याच बरोबर कार्यकर्त्यांचाही व्यक्तिमत्त्व विकास होत जातो. कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत पातळीवर साचलेपण येत नाही. चळवळीची कोंडी फुटायला मदत होते.

याबाबतीत 'विनिशि' स्पष्ट भूमिका घ्यायला तयार नाही. किंबहुना एकूण वातावरण या कार्यकर्त्यांच्या संचाची फारशी दखल न घेणारे व सामूहिकपणावर भरोसा न दाखविणारेच बनते आहे. कार्यकर्ते, नेते दुखावतील म्हणून स्पष्ट न बोलण्याचा पायंडा जवळ जवळ विनिशिमध्ये पडलेला दिसतोय. जेव्हा जेव्हा स्पष्ट मत मांडण्याचा प्रयत्न झाला तेव्हा विनिशिच्या आसपास असे वातावरण निर्माण केले गेले की, त्या कार्यकर्त्यांनी वा संघटनेने न आलेलेच बरे. अखेर वाद नको म्हणून तेही हळूहळू येईनासे झाले.

## 'विनिशि' चे आकुंचन

'विनिशि' हे परिवर्तनवाद्यांचे व्यापक व्यासपीठ असताना ते मार्क्सवादी विरोधी ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न झाला.

मार्क्सवाद्यांतर्गत वर्ण–जाती व्यवस्थेबाबत वैचारिक चिकित्सा सुरू झाल्याचे जवळ जवळ सर्वांनीच मान्य केले आहे. आंबेडकरवाद्यांमध्येही चिकित्सकपणा येत आहे. आपल्या ' दलित चळवळीची वाटचाल ' या व्याख्यानाला सुरुवात करतानाचा प्रा. रावसाहेब कसबे म्हणतात, " दलित चळवळ ' यावर चर्चा दिवसेदिवस वाढणे ही दलित चळवळीच्या निश्चित दिशेसाठी आवश्यक बाब आहे. निश्चित दिशे अभावी कार्यकर्ते गतिमान आणि कृती प्रवण होत नसतात. ज्यांना समाजपरिवर्तनाची स्वप्ने पडतात त्यांनी सदैव चर्चेला तयार असणे आत्मपरिक्षणासाठी आवश्यक असते. म्हणूनच परिवर्तनवाद्यांचा प्रवास हा कठीण असतो."

ही नक्कीच स्वागतार्ह गोष्ट आहे. या प्रयत्नांना ' विनिशि ' च्या व्यासपीठावर आमंत्रित करून तेथे आपला अनुभव व विचार सांगण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न व्हायला पाहिजे होता. मार्क्सवादापासून विनिशि दूर ठेवणे हे उद्दिष्ट बनत गेले.

काही वर्षापासून ' सकप ' ची धुळ्याला विनिशि घेण्याची विनंती होत होती. आदिवासी भागात व जेथे मार्क्सवादी व इतर आदिवासी चळवळी जोरात आहेत अशा ठिकाणी विनिशि होणे याला सामाजिक व राजकीय अर्थाने महत्त्व होते. मार्क्सवादी चळवळी आदिवासी भागातच जशा वाढल्या तशा सपाट व बिगर आदिवासी भागात का रुजल्या नाहीत ? आदिवासींचा संघर्ष हा वर्ग संघर्ष की आदिवासी जमातींचा बिगर आदिवासी शाहू विरोधीचा सामाजिक-सांस्कृतिक संघर्ष ? आतापर्यंतची डावी आदिवासी चळवळ सर्वव्यापी का बनू शकली नाही ? आदी प्रश्नांवर अत्यंत खुल्या वातावरणात अशावेळी चर्चा करता आली असती. ' हिंदु कोड बील व आदिवासी स्त्री ' यावरील भूमिकेवर एकत्र येऊन लढ्याचा कदाचित कार्यक्रमही आखता आला असता. पण ' विनिशि ' ने धुळ्याला जाण्यास नकार दिलेला आहे.

यातील कारणे कॉ. शरद पाटील यांच्या कार्यपद्धती संवादाची कठोर भाषा व भूमिका असण्याची शक्यता आहे. परंतु सकप व कॉ. शरद पाटील यांची भूमिका ' विनिशि ' चौकटी बाहेरची मानण्याचे काहीही कारण नाही. मतभेद जरूर असतील. पण जोपर्यंत चर्चेला बंदी येत नाही तोपर्यंत मतभेद बाजूला काढून समान भूमिकेवर एकत्र येता आले पाहिजे. सामूहीक वाटचालीत मतभेदांवर चर्चा होऊ शकते.

प्रश्न उरतो कॉ. पाटील यांच्या कार्यपद्धती व संवाद पध्दतीचा. याविषयीचे आदर व विश्वास ठेवून 'विनिशि' अंतर्गत औपचारिक वा अनौपचारिक पातळीवर स्पष्ट मत सांगण्याचा अधिकार एकमेकाला दिलेलाच आहे.

व्यक्तीनिष्ठ विचारपध्दतीतून हे सर्व परिणाम होत असतात. जाणते-अजाणते-पणी ह्या विचार पध्दतीचा आधार घ्यायचा मोह अनेकांना सुटत नाही.

व्यक्ती व त्यांच्या भूमिका याला एका हद्दीपर्यंत नक्कीच महत्त्व असते. परंतु एखाद्या घटनेचे विवेचन करताना त्याला किती प्रमाणात महत्त्व द्यावे याचे भान सुटू देता कामा नये.

'सत्यशोधक मार्क्सवादी'च्या मे १९८४ च्या संपादकीयात बारामती, 'विनिशि' विषयीचे ऐतिहासिक महत्त्व स्विकारलेल्या 'समा' ने ज्या पध्दतीने बारामती शिबीराच्या व्यवहाराविषयी लिहिले आहे ती पध्दती नक्कीच राजकीय सौहार्दपणा टिकविणारी नाही. कितीही आघात झाले तरी आपल्या सोबतच्या मित्र संघटना–पक्ष यांना संपर्क साधून संवाद साधून, विनिशि च्या व्यवहाराविषयी लिहिता आले असते त्यातून वातावरणातील कटुता टाळता आली असती. प्रत्येकाला आपापल्या पक्ष-संघटनेच्या पातळीवर विनिशिचे परखड मूल्यमापन करण्याचा हक्कच आहे.

परंतु जेव्हा आपण सामूहिक पद्धतीने एका सामायिक व्यासपीठावर काही एक राजकीय-सामाजिक व्यवहार साधायला एकत्र येत असतो तेव्हा ही काही पथ्ये पाळली पाहिजेत. विचारात स्पष्टता, परखडपणा हवा. पण परस्पर विश्वासाला तडा जाता कामा नये.

मार्क्सवादी विचार प्रवाहा विषयी विनिशिचा असा व्यवहार चालू असताना दुसरीकडे फुले, आंबेडकर, शाहू महाराज, डॉ. लोहिया आदींच्या नेतृत्वाखालील चळवळी व त्यांच्या विचारांचे वस्तुनिष्ठपणे मूल्यमापन करुन त्याविषयी सम्यक् दृष्टीकोण घेण्याचा प्रयत्न फारच अपुरा व एकांगी राहिला. किंबहुना ऐतिहासिक दृष्टिकोणाचा निटसा अभ्यास–चिंतन न झाल्याने व्यक्तिगत अनुभव, एका संघटनेचा विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील अनुभव हा सर्वसाधारण सिद्धांतनाचा आधार बनू लागल्याचे कधी कधी आढळले. त्यातूनच दलित चळवळ वस्तुनिष्ठपणे समजून घेता आलीय असे वाटत नाही.

जागृत होणाऱ्या विविध समूहांचे परस्पर संबंध याविषयी फारशी चर्चा व भूमिका न ठरल्याने जागा झालेला समूह व त्याचे नेतृत्व आपल्या सोबतच्या मित्र समूहालाच शत्रू व जबाबदार मानू लागतो. तसेच काहीसे या विविध समूहांतर्गत कधी कधी दिसते. या विषयीची सामूहिक जाण विकसीत करण्याची नितांत आवश्यकता आहे.

दलित कार्यकर्ते–दलित संघटना या विनिशिकडे नक्कीच आशेने पहात होत्या.

म्हणून तर काही संघटना या विनिशिला नियमित येत होत्या. परंतु निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग फारसा घेतला जात होता असे नाही. विविध विचार प्रवाहातून आलेले गट-संघटना-पक्ष होते. यात एका बाजूला मार्क्सवाद तर दुसऱ्या बाजूला गांधीवादाचे कलम आपल्यावर केले जाईल ही सतत भिती या संघटनांना होती. या वादांविषयी वर्ण-जाती व्यवस्थेसंदर्भात वस्तुनिष्ठपणे व परखडपणे भूमिका घेतली जात नाही तर मार्क्स वा गांधी यांचा कृत्रिमपणे फुले-आंबेडकर वादाशी समन्वय साधला जातोय अशा प्रामाणिक शंका दलित संघटना व कार्यकर्त्यांना पडत होत्या.

त्या दूर करण्याचा एकमेव मार्ग होता म्हणजे खुला वैचारिक संवाद. तो टाळला गेल्यानेच या प्रश्नांची व शंकांची उत्तरे मिळत गेली नाहीत दलित युवक आघाडी, सामाजिक समता समिती व काही कार्यकर्ते नक्कीच या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या प्रयत्नात होते व आहेत.

'एक गाव एक पाणवठा ' चळवळ एक निमित्त करून अनेक ठिकाणी जमीन रोजगार-किमान वेतनाच्या प्रश्नाला हात घालण्याचा प्रयत्न या संघटनांनी केलेला आढळतो.

'विनिशि 'च्या या वैचारिक बंदिस्तपणातूनच मार्क्सवादी व आंबेडकरवादी पक्ष-संघटना व कार्यकर्ते हळू हळू दूर गेले. यातून विनिशि आकुंचन पावत गेली.

या संदर्भात मार्क्सवादी विविध पक्ष व आंबेडकरवादी पक्ष -संघटना यांचा व्यवहार कसा राहिला आहे ?

भाकप व माकप सह मार्क्सवादी पक्षांनी विनिशिच्या या प्रयत्नाकडे फारसे गंभिरपणे पाहिलेय असे जाणवत नाही. आपल्या पक्षीय चौकटीबाहेर काय घडतेय कोणते नवे प्रयोग-प्रयत्न केले जात आहेत याची फारशी दखल हे पक्ष कधी घेत नसतात. जेव्हा थोडी फार घेतली जाते तेव्हा शंका घेतली जाते.

या देशातील तमाम जनजीवन ढवळून निघणाऱ्या ज्या काही चळवळी झाल्या त्यातील राजकीय पक्षांचे स्थान काय होते ? त्यातही मार्क्सवादी पक्षांचे स्थान काय होते. ?

भारतीय स्वातंत्र्य लढा, आणिबाणी विरोधी लढा, नामांतर लढा, आदि लढ्यात लोकांच्या नाडीचा ठोका फार उशिरा या पक्षांना समजलेला दिसतोय. नामांतर चळवळ ऐन भरात आलेली, ६ डिसें.१९७९ ला औरंगाबादकडे सगळीकडून जनता-कार्यकर्ते निघालेले आहेत अशावेळी मराठवाड्यात या कृतीने परत दलितांवर अत्याचार होतील. म्हणून हा लढा थांबवावा अशी भूमिका घेऊन आमचे काही

मार्क्सवादी सहकारी पुणे-मुंबईत पत्रक प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्नात होते. परंतु विचारवंत-साहित्यीक आदिंनी सह्या न दिल्याने त्यांचा तो बेत रहित झाला. दरम्यान नामांतराचा ऐतिहासिक सत्याग्रह आटपला होता. मराठवाड्यात कुठेच सवर्ण जातीयवाद्यांनी दलितांवर हल्ले करण्याचा प्रयत्न या काळात केलेला नाही.

जनतेची मानसिकता व परिस्थिती समजून घेण्यात झालेली चूक या मार्क्सवादी मित्रांची अनेक वेळा झालेली आढळते.

आंबेडकर चळवळीतून आलेल्या दलित संघटना व पक्षांनी नेटाने पुढाकार घेऊन विनिशित वर्ण-जाती व्यवस्थे बाबतचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोण मांडला असता तर विनिशिचे आजचे स्वरुप वेगळे दिसले असते. दलित नेतृत्वाने दलित जातींचे नेतृत्व करण्यात महत्व नाही तर समग्र समतावादी चळवळीचे-कष्टकरी-दलित जनतेचे नेतृत्व करण्याची राजकीय महत्वाकांक्षा बाळगायला हवी. परंतु त्याबाबत या संघटना अजून स्वत:च्या कोषातून पूर्णपणे बाहेर पडल्या आहेत असे दिसत नाहीत. फुले आंबेडकरवादी विश्लेषण पद्धती कोणती असेल तर ती विकसित करुन भारतीय वास्तवाची मांडणी करण्याची ऐतिहासिक जबाबदारी या व्यापक दृष्टिकोण असलेल्या दलित संघटना-पक्षांनी घेतली पाहिजे. मार्क्स-गांधी याबाबतीत आपली वस्तुनिष्ठ भूमिका मांडूनच भारतीय सम्यक् समाजवादी क्रांतीचा मार्ग व वर्ण-जाती लढ्यांची रणनिती सांगितली पाहिजे. प्रा. अरुण कांबळे, प्रा. रावसाहेब कसबे, बागुल आदी विचारवंत व नेते याबाबतीत प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसत आहेत. ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे.

स्पर्धेवर आधारित भांडवली अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणून दलितांसह सर्वच समूहांमध्ये नवा मध्यम वर्ग उदयाला येत आहे. हा वर्ग प्रस्थापिताच्या बाजूला जाणारच नाही याची कुणीही खात्री देवू शकत नाही. या समाजांर्गत प्रक्रियेचा वस्तुनिष्ठपणे अन्वयार्थ लावण्याची गरज आहे. 'समान संधीसाठी विशेष संधी' च आग्रह कायमच धरावा लागणार आहे. याच तत्त्वानुसार वर्ण जाती व्यवस्थेमध्ये मागासलेल्या जाती जमातींना राखीव जागांचा आग्रह धरत रहावे लागणार आहे. परंतु भांडवलशाहीचा परिणाम म्हणूनच सवर्ण जाती जमातींमध्येही कष्टकऱ्यांचा मागासलेल्यांचा बेकारांचा ताफा निर्माण झाला आहे. त्यांना वर्ण-जाती व्यवस्थे-बाबतची आपली भूमिका सांगून आपणा सर्वांचा लढा बेकारीविरुद्धचा आहे हे पटवून द्यायची जबाबदारी व त्या लढ्याचे नेतृत्व करण्याची तयारीही आपणाला दलित संघटना-नेतृत्वाला करावी लागणार आहे.

विनिशि मध्ये या पातळीवरील संवाद होण्यासाठी वातावरण व व्यापक दृष्टीकोण स्विकारण्याची गरज होती.

## विनिशि व राजकारण

१९६७ नंतर देशात व महाराष्ट्रात बिगर संसदीय पण राजकीय संघटना, गट मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आले. त्यांनी कधीच राजकीय पक्ष विरोधी (अँटी पार्टी) व शासन संस्थेविषयी उदासिनतेची भूमिका घेतलेली नाही. पदोपदी शासनसंस्थेचे स्वरूप व शासनकर्ता वर्ग-जातींचे राजकारण याकडे लक्ष दिलेले आहे. आपल्या मर्यादित भूमिका घेतलेली आहे. या संदर्भात युक्रांदच्या मूलभूत भूमिकेत म्हटलेय, "समाजवादी क्रांती आणण्याकरिता निवडणुकांच्या मार्गाने वा अन्य मार्गांनी शासनसंस्था आपल्या ताब्यात आणू इच्छिणाऱ्या खऱ्याखुऱ्या समाजवादी मित्रांबद्दल वा पक्षांबद्दल आमच्या मनात कुठल्याही तऱ्हेची उपहासाची वा उपेक्षेची भावना नाही. सम्यक् समाजवादी क्रांती घडवून आणण्याच्या कार्याचा एक भाग म्हणून समाजवादी राजकीय पक्ष म्हणून त्यांना शासनसंस्था ताब्यात आणावी लागेल." (पान १० : )

जेथे जेथे परस्पर विरोधी हितसंबंधांचा छेद जातो तेथे तेथे सामाजिक तणावाचे राजकारण निर्माण होते. अशा प्रत्येक संघर्षात 'विनिशि'चा कार्यकर्ता दलित, आदिवासी, भटका—विमुक्त, स्त्रिया आदी शोषित घटकांच्या बाजूने लढतो. अनुभव घेतो. पण या सामाजिक तणावामागिल वर्गीय, जातीय हितसंबंध सतत शोधता आले पाहिजेत. त्यातून श्रमिक, दलितांच्या व्यापक एकजूटीचा मार्ग स्पष्ट होतो. शत्रू-मित्राची व्याख्या स्पष्ट होते तिला राजकीय अर्थ प्राप्त होतो. अन्यथा आपल्याच चळवळीविषयी सरकारने उचललेल्या पावलांचा अर्थ लागत नाही.

'एक गाव एक पाणवठा' मोहिम सरकारने सुरू केली व नामांतराचा सर्वानुमतांनी संमत झालेला ठराव दलितांचे प्रचंड हत्याकांड होते. दलित-श्रमिक जनतेचा मोठा सत्याग्रही लढा होतो-तरीही नामांतराची मागणी अंमलात आणली जात नाही उलट मतदान करून हा ठराव फेटाळला जातो. एकाच वर्ग-जातीय सरकारच्या या दोन कृतींचा नेमका अर्थ काय ?

पाणवठा चळवळीतून जमीन-रोजगार, किमान वेतन, स्त्रीयांचे प्रश्न वर आले होते. नामांतर लढ्यात सवर्ण कष्टकरी समूहांना या लढ्याकडे वेगळ्या दृष्टीने पहायला लावून दलित-श्रमिक एकजूटीचा पाया याच लढ्यात घालण्यासाठी रोजगार, जमीन वाटप, किमान वेतन, कर्ज मुक्ती, पाणी वाटप आदी प्रश्नांवर भूमिका घ्यायला हवी होती. यातून वर्ण-जाती लढ्यातील अग्रेसर असलेल्या दलित जनतेला स्वतःच्या नेतृत्वाखाली कष्टकरी सवर्ण समूहासह मोठ्या जनतेच्या प्रश्नावर भूमिका घ्यायला लागताच लढ्याचे स्वरूप, ताण, तणावांचे स्वरूपही बदलते.

परंतु या मांडणीला दोन पातळीवर विरोध करून फेटाळले जायचे. एक यातून नामांतरासारखा प्रश्न बाजूला पडेल व दोन, ही मार्क्सवादी वर्गवादी भूमिका आहे.

आता सर्वच पक्ष–संघटना इतर अनेक मागण्यांबरोबर नामांतराची मागणी घालतात. मग या मागची भूमिका काय ?

वर्गलढा आणि वर्णलढा एकाचवेळी चालवण्याची भूमिका जवळ जवळ अनेक पक्ष–संघटना मांडतात. मार्क्सवादी भूमिकेतून वर्गलढ्याची रणनिती सांगितली जाते. इतक्या वर्षाच्या भरभक्कम अनुभवातून व फुले, आंबेडकरांच्या विचारांच्या आधारे वस्तुनिष्ठपणे वर्ण–जाती लढ्याची रणनिती सांगण्याचा प्रयत्न विनिशिने केलेला नाही.

पाणवठा, नामांतरासह महत्त्वाच्या चळवळींचे वर्गीय, जातीय दृष्टीकोणातून मूल्यमापन विनिशि मध्ये व्हायची गरज होती. त्यावेळी यश, अपयश, पाणवठे किती खुले झाले. नामांतर झाले का अशा स्वरूपाची उत्तरे अपेक्षित नाहीत. यातून मोकळ्या झालेल्या शक्ति कोणत्या, विरोध व पाठिंबा मिळालेल्या शक्ति, त्यांचे वर्गिय–जातीय स्वरूप, विरोधाची तात्कालिक व ऐतिहासिक कारणे, अन्य सवर्ण कष्टकरी वर्ग--जातींमधील प्रतिक्रिया आदी प्रश्नांवर जेव्हा आपण विचार करू तेव्हा त्यातून लढ्याची रणनिती व संघटनेची कार्यपद्धती विकसीत करता येईल.

याबाबत राजकीय दृष्टिकोण स्विकारण्याऐवजी अराजकीय बनण्याकडेच 'विनिशि'ने वाटचाल केलेली दिसतेय. ही आपली पिछेहाटच मानली पाहिजे.

राजकीय भूमिका चर्चा वांझ मानली जाते. यातून वाद होतात. संघटना-पक्ष फुटतात त्यापेक्षा ती न घेतलेलीच बरी. अशी भूमिका पुढे येऊ लागली. पण यातून 'विनिशि' काही भक्कम झालेली दिसत नाही युक्रांद, श्रमिक संघटना, राष्ट्र सेवा दल, संघर्ष वाहिनी, समता आंदोलन आदी संघटनांमध्ये वाद उभे ठाकले. या वादांचा अर्थ काय व त्याची कारणे काय याची मिमांसा 'विनिशि'ने सर्वांच्या पुढे जाऊन करायला हवी होती राजकीय वाद टाळता येत नसतात. ते कसे, कुठे, कोणत्या पद्धतीने व कशासाठी घालायचे याविषयी वर सांगितलेली पथ्ये पाळली तर नक्कीच उपयुक्त ठरतात.

समाजातल्या तळच्या थरांचे जिवंत प्रश्न सोडवायच्या कामात तुम्ही पडलात की, सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक असे कप्पे न पाडता न्यायाची, हक्कांची

चळवळ घेईल तो आकार घेऊ देत पुढे रेटायची असते. असा एक विचार विनिशि. त प्रथमपासून वारंवार मांडला जातो.

तळच्या थरांशी बांधिलकी निर्माण करणे व लढे उभारणे हे चळवळीचे उद्दिष्ट नसते. समाजात आपोआप होणारे बदल हे आमुलाग्र परिवर्तन नसते. त्या बदलांचा अर्थ लावत क्रांतीकारक वर्ग, जातीय समूहांच्या लढाऊ संघटनांच्या जोरावरच राजकीय पक्ष व संघटना आमुलाग्र परिवर्तन घडवून आणू शकतात. त्याला तत्त्वज्ञान व सिद्धांताची जोड असावी लागते. आताच्या परिस्थितीत विनिशिने ही जागृती निर्माण करण्याचे प्राथमिक काम करायचे आहेच पण त्यापलिकडे जाण्याचे तत्वज्ञान, सम्यक दृष्टिकोण विकसीत करायला हवा.

सर्व चळवळींचा व्यवस्था परिवर्तनाशी कसा संबंध जोडणार याची मांडणी करावी लागेल.

आपापत: जे जे वळण चळवळीला लागेल ते लागू द्यायचे हे राजकीय इच्छा, शक्ती नसण्याचे वा ती निर्माण होवू न देण्याचेच लक्षण मानले जाते.

## अतिरेकी व्यक्तिवाद व संघटना विरोधी भूमिका

संसदबाह्य संघटनांसमोर काही गंभिर स्वरुपाचे प्रश्न समोर ठाकले आहेत. त्यांची चर्चा विनिशि मध्ये फारशी झाली नाही.

२० व २१ सप्टें. १९८० साली कोल्हापूर येथे गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्थेमार्फत ' महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन आगामी दशक ' यावर एक चर्चा सत्र झाले. महाराष्ट्रातील २० पैकी १८ संघटनांचे ४५ पूर्णवेळ कार्यकर्ते या चर्चासत्राला आले होते. प्रा. गं. बा. सरदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या चर्चासत्रात अनुभव कथन, सामाजिक व आर्थिक चळवळींचा मेळ कसा घालता येईल, आर्थिक, सामाजिक आंदोलन व राजकारण या तीन सत्रात चर्चा झाली. अनेक महत्वाचे मुद्दे पुढे आले. पण यातून पुढे वाटचाल झाली नाही. या चर्चा सत्राची एकत्रित अहवाल पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मात्र पुढे आलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे सामुहिकपणे शोधण्याऐवजी एक नवा विचारप्रवाह विनिशिमधून मांडला जाऊ लागला. कोल्हापूर विनिशित हा जोरदारपणे पुढे आला.

संघटना केली की, तिचे तत्वज्ञान येते. राजकीय भूमिका, धोरण येते. त्यासाठी शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचा संच लागतो. या प्रकारातून माणसाच्या विकासाऐवजी त्याचे व्यक्तिमत्व बंदिस्त चौकटीत कोंबण्याचा प्रयत्न होतो. त्याच्या सर्जनशीलतेला, प्रयोगशिलतेला मर्यादा पडतात. किंबहुना त्या मारल्या जातात. माणूस कोरडा बनतो. त्याच्या भाव भावना नष्ट होतात.

या उलट माणूस मोकळा असेल म्हणजे संघटनेबाहेर असेल तर त्याचे व्यक्तिमत्व चौफेर फुलून निघते. त्याच्या सुप्त गुणांच्या विकासाला, त्याच्या सर्जनशिलतेला व प्रयोगशिलतेला प्रचंड वाव मिळतो. उदा. विडी कामगार, भंगी, देवदासी आदी मानवी समूहांच्या प्रश्नावर अभ्यासपूर्ण लिखाण, संशोधन झाले. त्यातून या समूहांच्या विविध पैलूंवर प्रकाश पडला. त्यांच्या प्रश्नांची माहिती इतर मानवी समाजाला झाली. तिकडे सर्वांचे लक्ष गेले. असे एक एक काम झाले की परत माणूस मोकळा. नव्या प्रश्नाला सामोरा जायला.

या विचार मांडणीचा जवळ जवळ सूर असा होता की, या संघटना व राजकीय भूमिकातून माणसाचा कार्यकर्ता बनतो व त्याचे माणूसपण नष्ट होते. यातू- परिवर्तन होत नसते !

एक व्यक्ती-पत्रकार-लेखक-इतिहासकार-संशोधक असा व्यक्तीगत पातळीवर विचार मांडतो तेव्हा त्याची फारशी दखल घ्यायची गरज नसते. परंतु बिनिशि सारख्या व्यापक व्यासपीठावर जेव्हा हे मांडले जाते व त्यातून माणूस - समाजन व्यक्तिस्वातंत्र्य व मानवी समाजांतर्गत होणारे बदल याविषयीचा एक सिद्धांत मांडला जातो तेव्हा त्याची गंभीरपणे दखल घ्यावीच लागते.

हा विचार मांडताना वास्तवाचा चुकीचा अर्थ लावलेला आहे.

मानवी समाजातील विविध समूहांच्या जीवनाची माहिती पुढे येणे, त्यावर चर्चा होणे, सातत्याच्या प्रयत्नातून हे:मानवी समूह जागृत होऊन संघटीत होणे व आपल्या मानवी हक्कांसाठी लढायला लागणे. त्यातून दलित, आदिवासी, भटके- विमुक्त, स्त्रिया आदींचे नेतृत्व पुढे येणे, त्यांचे म्हणून त्यांच्या भाषेतील जिवंतपणा घेऊन साहित्य निर्माण होणे हा सर्व प्रकार एकूण मानवी समाजांतर्गत निरंतर चाललेल्या बदलाच्या प्रक्रियेचाच एक भाग आहे. तो जाणीवपूर्वक एका विशिष्ट तत्त्वज्ञान - भूमिका, शिस्त व दिशेने केल्यास त्याला हवे तसे वळण लावता येते. पण बाह्य परिस्थितीचाही त्यावर परिणाम होत असतो हे विसरून चालणार नाही एका मोठ्या समूहात झालेला तो बदल असतो.

या बदलाचा अर्थ लावायचा दृष्टीकोण हवा. तो नसेल तर व्यक्तीच्या असामान्य कर्तृत्वावर ते सोपविले जाते. यातून ' अतिरेकी व्यक्तीवाद ' उदयाला येतो.

व्यक्ती कितीही मोठी, कुवतवान असली तरीही तिला मर्यादा पडतात. या देशातील लोकमान्यता पावलेले दोन नेते म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाचा व तत्कालीन परिस्थितीचा विचार केला तर मोहनदास करमचंद

गांधी व भिमराव रामजी आंबेडकर या व्यक्तींचे नेतृत्व म्हणून नक्कीच मोठे गुण होते. पण म्हणून त्यावेळची परिस्थिती बदलण्यात या दोन व्यक्तिमत्वांचाच सर्वात मोठा हात होता व संघटना, पक्ष, समाजांतर्गत विविध सामाजिक घटक यांचा काहीच वाटा नाही हे म्हणजे अवास्तववादी आहे.

हिंदु धर्मातील अवतारवादाची कल्पनाच याचे समर्थन करू शकते. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा नसलेल्या दलित जाती, भटके-विमुक्त, आदिवासी, स्त्रिया आदी समूहांना संघटना हेच एकमेव प्रभावी हत्यार आहे. याच हत्याराच्या जोरावर व समतेच्या तत्वज्ञानाच्या आधारावर अविरत संघर्ष करून प्रस्थापित व्यवस्था नष्ट करता येईल. स्वतःचा नवीन समाज निर्माण करता येईल.

समतावादी चळवळीत विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक थरातून कार्यकर्ते येत असतात. विनिशि सारख्या व्यापक, सामायिक व्यासपीठावर हे सर्व कार्यकर्ते एकत्र येणे स्वाभाविक व स्वागतार्ह आहे. पण या व्यासपीठावर या 'अतिरेकी व्यक्तिवादी व संघटना विरोधी' विचारांना मांडायला दिले जाते; त्यावर कोणतीच भूमिका न मांडता उलट तिचे समर्थन केले जाते; ही अत्यंत घोडचूक आहे. ज्या वर्ग - वर्ण जाती व्यवस्थेला ब्राह्मणी संस्कृती व ब्राह्मणशाहीने भौतिक आधार दिला व हजारो वर्षे व्यवहार चालविला तसाच व्यवहार नव्या भांडवली व्यवस्थेमध्ये चालविणारा हा विचार आहे.

सरंजामी अवशेष व वर्ण जातीव्यवस्था नवीन स्वरुपात घेऊन विकसित होत जाणाऱ्या भांडवलशाहीच्या मूल्यांबाबत झालेली ही गल्लत आहे. बाह्य वास्तव अनुभव समजून घेण्याची समतावादी विचारपद्धती नसल्यामुळेच हा विचार पुढे येत आहे.

विनिशि ने 'अराजकीय' भूमिका घेतल्याबरोबर 'अतिरेकी व्यक्तिवाद व संघटना विरोध' पुढे येत गेला.

## परकीय पैसा व विनिशि

मागील दशकात या संदर्भात आणखी एक महत्वाचा बदल दिसतो आहे. वर म्हटल्याप्रमाणे जशा काही संघटना 'विनिशि' ला येईनाशा झाल्या तसे काही गट संस्था अधिक येऊ लागल्या. परदेशी संस्थांकडून पैसा घेऊन काम करणाऱ्या या गट व संस्था आहेत.

आमूलाग्र परिवर्तनासाठी समतावादी तत्वज्ञान घेऊन अविरत संघर्ष व त्यासाठी रचनात्मक काम करणाऱ्या शक्तिंना परदेशी पैशावर हे करता येईल असे अजिबात वाटत नाही. आजपर्यंतचा तसा अनुभव नाही. ज्या वर्ग, जाती समूहांमध्ये

चळवळ उभारण्याचे काम आपण करतो या समूह व सहानभूतीदार मध्यम वर्गातूनच हे अथिक पाठबळ सुरुवातीला उभे रहातानाचा अनुभव आहे याच समूहांचे रहाणीमान संघर्षासाठीच्या एका पातळीपर्यंत उंचावण्यासाठी जे आर्थिक लढे व पूरक रचनात्मक प्रयोग केले जातील त्यातून मोठे आर्थिक पाठबळ या लढ्यासाठी मिळवावे लागेल. चळवळीच्या विविध आघाडयांवर विविध स्तरातील कार्यकर्ते कामाला लागतील तेव्हाच असा अपेक्षित परिणाम झालेला दिसेल.

३ ते ५ मे १९८५ ला पुणे येथे शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये झालेल्या 'विनिशि' शिबिरात परिवर्तनवादी संघटनांनी राजकारणात भाग घ्यावा की नाही ? सरकारचे सहकार्य कितपत घ्यावे ? परदेशी देणग्यांचा स्वीकार करावा की नाही ? या सगळया प्रश्नांचा उहापोह झाला व त्यातून एक महत्वाचा मार्ग सापडला.

संसदबाह्य क्षेत्रात काम करणाऱ्या परिवर्तनवादी संघटनांसाठी २५ लाख रुपयांचा 'सामाजिक कृतज्ञता निधी' जमविण्याचा संकल्प या शिबिरात सोडण्यात आला. हा निधी बँकेत ठेवून आलेल्या व्याजातून निदान शंभर कार्यकर्त्यांना दरमहा ३०० रु. मानधन देण्यात यावे अशी योजनाही यावेळी मांडण्यात आली.

या विषयावर एप्रिल–मे–जून १९८५ च्या 'पुस'च्या विनिशि अंकाच्या संपादकीयात बाबा आढाव लिहितात,

" आर्थिक, सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी विलक्षण कुतरओढ होते. अनेक ठिकाणी परकीय मदतीचा 'बाऊ' केला जातो. 'बाऊ' म्हणण्याचे कारण या कार्यकर्त्यांना मदत करणाऱ्या परकीय संस्थांना केंद्र शासनाची मान्यता असल्या-शिवाय मदतकार्य करता येत नाही. याउलट प्रतिगामी शक्तिना प्रचंड आर्थिक साहाय्य विविध मार्गांनी होत राहते. या देशातील काळा पैसा, तस्करी, परदेशी हस्तक व देशातील भांडवलदार व धनिक सनातनी, यांच्याकडून आर्थिक साहाय्य मिळते. यामुळेच आदिवासी खेडयांतील झोपडयांच्या परिसरात मंदिरे उभारली जाऊ शकतात. मशिदींची उभारणी होऊ शकते. परिवर्तनवादी कार्यकर्ते परस्परां-बद्दल साशक बनतात. 'विनिशि'त या प्रश्नांवर उहापोह झाला. "( पान ३ )

दोन दशकापूर्वी परकीय पैसा घेऊन धर्माच्या नावाने विशिष्ट समूह व विभागातच काम सुरू झाले. आता ते हळू हळू धर्माकडून इतर माध्यमाकडे वळले आहे. यातून एक विशिष्ट प्रकारची विचारसरणी–संघटना पद्धती व कार्यपद्धती तकसीन केली जात आहे. राजकारण-संघटना व पक्षविरोधी भूमिकेतून तळच्या

दलित–आदिवासी–भटके–विमुक्त आदी समूहांमध्ये जागृती निर्माण केली जात आहे. शासनसंस्थेविषयी उदासीनता बाळगली जात आहे. या सर्व प्रश्नांवर 'विनिशि'तून चर्चा होण्याची गरज आहे. या चर्चेत असा पैसा घेणारे आपले सहकारी आपले प्रत्यक्ष अनुभव सांगतील. पैसा न घेणारे आपणही याबाबतीत भूमिका मांडली पाहिजे. प्रथमदर्शनी परस्परांवर अविश्वास दाखविण्याची गरज नाही. याबाबतीत दोन गोष्टी प्रकर्षाने नजरेतून सुटत नाहीत. एक खालच्या वर्ग–जातीतून आलेले कार्यकर्ते–गट संस्था कमालीच्या आर्थिक अडचणींमुळे नाईलाजाने परकीय पैश्याकडे वळत आहेत. व दोन या दशकात बिगर संसदीय व सांसदीय क्षेत्रात काम करणाऱ्यांत परकीय पैसा घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. असे पैसे न घेणाऱ्या आमच्या सारख्या संघटनांची संख्या अत्यल्प आहे.

या वस्तुस्थितीचा नेमका अर्थ काय ? केंद्र शासनाची मान्यता मिळवूनच हा पैसा संस्थांना मिळतो. त्यामुळे कुणी चोरुन पैसे मिळवतोय असे म्हणण्याची गरज नाही. सरकारची मान्यता म्हणजे त्यात कष्टकरी दलितांच्या विरोधी राजकारण, डाव असणारच नाही असे मानून निर्धास्त रहाणेही चूक ठरेल.

आता तर केंद्र सरकारच अशा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांची परिषद (कौन्सील) बनवून त्यांच्या कार्यासाठी २०० कोटी रुपये मंजूर करणार आहे. एवढया मोठ्या प्रमाणावर राजीव गांधींचे सरकार या संस्थाकडे लक्ष देत आहे याचा अर्थ काय लावणार ?

'सामाजिक कृतज्ञता निधी' जमविण्यामागची आपल्या सहकाऱ्यांची भूमिका व केंद्र सरकारची परकीय पैसा अधिक २०० कोटी रुपये देण्यामागची भूमिका एकच मानायची का ? या मागिल एक मोठा 'राजकीय डाव' आहे. तो ओळखून 'विनिशि'ने जाहिर भूमिका घेण्याची गरज आहे. तोपर्यंत असा पैसा घेणाऱ्या सहकारी व संस्थांना 'विनिशि' बंद करावे व संवाद तोडावा असे नाही.

मागिल दोन दशकभर नुसती नजर टाकली व विघटीत झालेल्या संघटना पाहिल्या तरी या संघटनेचे कार्यकर्ते प्रतिकूल परिस्थितीत सर्व प्रकारच्या आर्थिक, कौटुंबिक, मानसिक ताणांवर यशस्वीपणे मात करून आपापल्या क्षेत्रात आपल्या समूहांसोबत पाय रोवून उभे ठाकलेले आढळतील. यातील बरेच कार्यकर्ते तळच्या सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक थरातून झालेले आहेत हे विशेषत्वाने नमूद करावेसे वाटते. ही आपापल्या संघटनांचीच नव्हे तर एका व्यापक समतावादी चळवळीची जमेची बाजू आहे. 'विनिशि'ला याविषयी सार्थ अभिमान वाटायला पहिजे.

आणिबाणी सदृश्य अभूतपूर्व परिस्थितीतूनही मार्ग काढलेल्या आपल्या या सहकाऱ्यांच्या राजकीय इच्छाशक्ती, मनोबल व परिवर्तनाच्या प्रेरणांचा शोध घेऊन त्या समजून घेतल्या पाहिजेत. कष्टकरी–दलित–आदिवासी–भटके–विमुक्त स्त्रियांच्या समतावादी चळवळीचा प्रवाह उत्तरोत्तर व्यापक व व्यवस्थाविरोधी प्रवाहाचे रूप धारण करील हीच आशा स्वप्न उराशी बाळगून हे आपले सहकारी राबताहेत. 'विनिशि' कडेही याच भूमिकेतुन कार्यकर्ते पहात आहेत.

या सर्व काळात काहीजण कामी झाले आहेत. तर भिमराव म्हस्के सारख्या आपल्या सहकाऱ्याला धुळे जिल्हयातून हद्दपार करण्यात येत आहे.

या सर्वांच्या संघर्षशील चारित्र्याचा सामूहिकपणे शोध व अर्थ लावण्याची भूमिका 'विनिशि' मध्ये फारशी कधी आली नाही. परकीय पैसा घेणाऱ्याविषयी 'बाऊ' करण्याचा मुद्दा सोडाच पण मदत न घेणाऱ्या व प्रत्यक्ष कार्य सुरळीतपणे चाललेल्या आर्थिक तणावांची फारशी चर्चा न करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आर्थिक चारित्र्याविषयी शंका घेतल्या जात आहेत परकीय पैसा न घेता विशिष्ट कार्य-पद्धती कार्यकर्त्यांचा प्रामाणिक संच व समूहाशी घनिष्ठ संबंध यातून चळवळ फार वेगाने नाही पण शांतपणे विकसीत करता येते यावरचा विश्वास उडत चाललाय की काय अशी शंका वाटू लागलीय.

परकीय पैश्यातून वा सहजगत्या मोठ्या प्रमाणावर मिळत गेलेल्या पैश्यातून विचित्र परिणाम चळवळीच्या वैचारिक संघटना व कार्यकर्त्यांवर होतात हे मात्र नक्की आहे.

या प्रकारच्या चर्चेतून 'सामाजिक कृतज्ञता निधी'चा निर्णय झाला असता तर त्याला वेगळे महत्व होते.

## विनिशि कार्यपद्धती व नेतृत्व

'विनिशि' मध्ये नेतृत्वाबाबत वाद उभा राहिला होता कां? प्रत्यक्षात नाही. यातून व्यासपीठ आकुंचन पावलेले नाही.

'विनिशि'त व बाहेर वाद--प्रश्न आले ते कार्यपद्धती व निर्णय प्रक्रियेबाबत. १९७७ ला प्रतिज्ञा केल्याप्रमाणे वर्ण--जातीच्या प्रश्नावर निश्चित भूमिका व कार्यक्रम घेणारे पुरोगामी शक्तिचे व्यासपीठ असावे यात कुणाचेच मतभेद नव्हते. किंबहुना येथे आलेल्या पक्ष व संघटनांनी वैचारिक पातळीवर वर्ग लढ्या इतकेच महत्वाचे स्थान वर्ण--जाती लढ्याला दिलेले आहे.

१९७७ ला पुण्यात इं. से. सोसायटी, स. प्र. संस्था, म. फुले समता प्रति–

ष्ठान व आंतरभारती या संस्थांनी पुढाकार घेऊन पहिले शिबीर घेतले. पुढे यांत अनेक संघटना–पक्षात आले. पण प्रत्यक्षात दरवर्षी शिबीर घेण्यात व त्याचे सर्व कष्ट पुण्याच्या म. फुले समता प्रतिष्ठान, 'विनिशि' पुणे व जेथे शिबीर असेल तेथील शिबीर समितीने उपसलेले आहेत. इतर सहभागी संघटनांनी फारसे कष्ट केलेले नाहीत.

शिबीराचे स्वरुप व विषय ठरविण्यापूर्वी काही वेळा सर्व संघटना कार्यकर्ते यांना पत्रे जातात. पण याबाबतच्या सूचना फारशा केल्या गेल्या नाहीत. परिणामी पुण्यातील व इतर काही भागातील आपले सहकारी मिळूनच निर्णय घेत होते. याबाबतीत जवळ जवळ सर्वच पक्ष संघटनांचा निरुत्साह जाणवतो.

हा निरुत्साह 'विनिस' च्या कार्यपद्धतीतील योग्य बदल व प्रथमपासून सर्वांचा सहभाग घेतल्याने दूर करता आला असता. 'विनिशि'त सर्वजण असायचे पण तत्पुर्वी सहभागी पक्ष–संघटना व त्यांच्या प्रतिनिधींची वर्षभरात अधिकृतपणे बैठक बोलाविलेली नाही. यात मागिल शिबीराचे मूल्यमापन, तत्कालीन बाह्य परिस्थिती व पुढील शिबीर अशी चर्चा झाली असती.

दर आठवड्याला पुण्यात 'विनिस'ची बैठक व्हायची. पण ती स्थानिक पातळीवरची. तशा जिल्हा वा विभागवार समित्या फारशा झाल्या नाहीत पुण्यात 'विनिस' सक्रिय होती यातून 'विनिशि'ची निर्णय प्रक्रियाही सर्व विचारप्रवाहांना सामावून न घेतल्याने संकुचीत होत गेली. त्याच्या मर्यादा पुढे पुढे 'विनिशि' वर पडत गेल्या.

लातूर शिबीराच्या काळातील नामांतराची ऐतिहासिक पार्श्वभूमी व नागपूर शिबीराच्या स्थानिक संयोजन समितीची काही प्रश्नांबाबतची स्पष्ट भूमिका यातून ही दोन्ही शिबीरे सर्व विचार प्रवाहांना या व्यासपीठावर आण-ण्यात यशस्वी ठरली.

## ' विनिशि ' चा कार्यक्रम

आतापर्यंतच्या काळात ' विनिशि ' ने सर्व संघटना पक्ष कार्यकर्ते व जनसमूह यांना व्यापणारा व सामाजिक रचनेशी सरळ सरळ भिडणारा असा कार्यक्रम दिलेला नाही एक गाव एक पाणवठा, व नामांतर या चळवळी आधीच ' विनिशि ' बाहेर सक्रिय होत्या त्यात 'विनिस' सक्रियपणे उतरली. परिणामी दैनंदिन व स्थानिक कार्यक्रमात अडकलेल्या संघटना-पक्ष व कार्यकर्ते यांना या व्यासपीठाचे वेगळेपण जाणवेना. निश्चित भूमिका व कार्यक्रमावर शक्ती एकत्रित करण्याचे काम 'विनिशि' कडून होण्याची काहीच लक्षणे दिसेनात. निव्वळ अनुभवासाठी अनुभव ऐकण्यात व सांगण्यात रस राहिला नाही

परिवर्तनवादी विविध चळवळींना सामावून घेईल, परस्पर विश्वास देईल,

आतापर्यंतच्या अनुभवांची देवाण घेवाण होईल, त्यांचे सामूहिकपणे मूल्यमापन होईल, यातून निश्चित अशा सिद्धांतनाकडे जाता येईल, वर्ण-जाती लढयाचे तित्वज्ञान व रणनिती विकसीत करता येईल आणि या सर्व प्रवाहातून प्रस्थापित व्यवस्थेला हादरा देणारी चळवळ उभी राहील, अशा एका सामायिक व्यासपीठाची ऐतिहासिक व राजकीय गरज निर्माण झाली होती. ती गरज ' विनिस ' पूर्णपणे भागवू शकली नाही !

## आजची गरज

मागील प्रश्नांची तिव्रता उत्तरोत्तर वाढत चालली आहे. जुनेच राज्यकर्ते नवे चेहरे व कपडे घालून जनतेसमोर आले आहेत. भांडवली विकासाचा वेग एकदम वाढविण्याचा प्रयत्न चाललाय. या धक्क्यात कष्टकरी-दलित समूहाची मोठया प्रमाणावर कत्तल होणार आहे. अत्यंत गोंडस रूप घेऊन येथील व्यवस्था हे सारे निपचिप करणार आहे.

वर्षानुवर्षापासून सडत राहिलेले प्रश्न हातावेगळे करुन कार्यक्षम सरकारचा नजराणा पेश केला जात आहे. पंजाब, असम, मिझोराम आदी करारातून काय साधलेय याचे गणित मांडण्याआधीच पंजाब प्रश्न चिघळलाय. धर्मांध शक्तींचे अतिरेकी दहशतवादी हिंस्त्र स्वरूप आपण पहात आहोतच. पण या शक्तीला धर्मनिरपेक्षतावादी, समतावादी शक्ती सामोरे जाण्याऐवजी दुसऱ्या धर्मांध शक्ती व दमन यंत्रणा सामोऱ्या जात आहेत. यातून दोन्ही धर्मांध शक्ती वाढणार आहेत. दोन्ही मिळून समतावादी - धर्मनिरपेक्षतावादी शक्तींना चिरडुन टाकणार आहेत.

गावागावातून हे वीष पेरलेले उगवते आहे. भूमिहीन शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, दलित, आदिवासी, भटका, विमुक्त व स्त्रियांना दडपायचे सत्र चालू झाले आहे. गावं दुभंगली आहेत. त्यांना सांधण्याचे प्रयत्न नगण्य आहेत.

वाढती महागाई, बेकारी यातून वाचलेला माणूस भिषण दुष्काळाने पार होरपळून निघतो आहे. रोजगार, चारा, पाणी प्रश्न गंभिर बनलाय.

या पार्श्वभूमिवर महाराष्ट्रभर ठिकठिकाणी विविध राजकीय पक्ष, संघटना, व्यक्ती कार्यरत आहे. आपापल्या परिने झगडताहेत. उत्तरे शोधताहेत. परंतु गोल रिंगणात सापडल्यागत त्यांची अवस्था झालीय.

आतापर्यंत केलेला सर्वच व्यवहार, कृती शांतपणे तपासून पहाण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी हवे आहे या सर्वांना सामावून घेणारे व्यासपीठ. स्वत:पेक्षा उद्दिष्ट मोठे मानून एका व्यापक जाणिवेतून या व्यासपीठावर एकत्र येण्याची व राजकीय संवाद करण्याची तितकीच गरज निर्माण झाली आहे जितकी ' विनिस ' च्या काळात. किंबहुना अधिक.

० ० ०

घोषणा प्रकाशन; मालक, मुद्रक, प्रकाशक–वसुधा सरदार
प्रकाशन स्थळ : १२४३/२ आपटे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४
फोन ५८८०९
मुद्रण स्थळ : ११२१, प्रिंट आर्ट एन्टरप्रायजेस शिवाजीनगर, पुणे १६
किंमत : चार रुपये